श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.



'आवो साईबाबा'
इती उवाच म्हाळसापती

मे १९८२]

[किंमत एक रुपया

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

वर्ष ६१ वे )　　किंमत १ रुपया　　( अंक २

मे १९८२

: कार्यालय :
“ साईनिकेतन ”, प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

आस्तिक्य बुद्धि श्रद्धास्थिती ।
हीच भक्ताची हृदयपणती ।
प्रेमस्नेहें उजळिजे वाती ।
ज्ञानज्योती प्रकटेल ॥ २६ ॥

प्रेमावीण शुष्क ज्ञान ।
तयाचें कोणा काय प्रयोजन ।
विनाप्रेम न समाधान ।
प्रेम अविच्छिन्न असावें ॥ २७ ॥

काय वानूं प्रेम महिमान ।
तया पुढें तुच्छ आन ।
गांठी नसल्या प्रेम गहन ।
श्रवण वाचन निष्फळ ॥ २८ ॥

प्रेमापाशीं नांदे भक्ति ।
तेथेंच अवघी शांती विरक्ति ।
तेथेंच पाठीं तिष्ठे मुक्ति ।
निज संपत्ती समवेत ॥ २९ ॥

प्रेम उपजे भावावीण ।
भाव तेथें देव जाण ।
भावापोटीं प्रेम पूर्ण ।
भावचि कारण भवतरणा ॥ ३० ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४८ वा.

श्रोतं श्रुते दैवं न कुंडलेन ।
दानेन पाणि न तु कंकणेन ॥
विमति कायः खलु सज्जनानम् ।
परोपकारेण न तु चंदनेन ॥

चांगल्या गोष्टी ऐकल्याने
कान शोभून दिसतात, कानात
कुंडले घातल्याने नव्हे.
दान केल्याने हात शोभून दिसतात
हातात कडे घातल्याने नव्हे.
सज्जन लोकांचे शरीर परोपकाराने
शोभून दिसते. शरीरास चंदन
घासल्याने नव्हे !

— श्रीसाईराम

# अनुक्रमणिका मे १९८२


१) संपादकीय — जीवन सहलीतील मार्गदर्शक
२) श्रीमाताजी मैयाजी महाराज — श्री. गणपतराव सामंत
३) मौन, मौनी आणि मनःशांती — प्रा. श्री. र. श्री. पुजारी
४) काशीला खुद्द बाबांनी पिंड हाती घेतले — श्री. नानासाहेब जोशी
५) श्रीसाई हे परमेश्वराचे प्रेषित कसे ? — श्री. पां. वा. भुतकर
६) श्री बाबांचा चमत्कार — श्री. सुधीर पितळे
७) किल्ल्यांचा चमत्कार — सौ. विजया देसाई
८) अशी ही एक होळी पौर्णिमा — श्री. विजय हजारे
९) भाच्याने सांगितलेला एक किस्सा — सौ. निर्मला मालवणकर
१०) आम्ही साई पूजेला का लागलो — श्री. नंदकुमार बेलवलकर
११) श्रीसाईसच्चरित्रातील निमित्त स्थळे व परिणाम — श्री. माधव गोरे
१२) श्री साईरामाचे प्रकट बोल — सौ. उषा अधिकारी
१३) शुभकामनापर संदेश पाठविणारे भक्त — —
१४) श्री साईलीलाची षष्ठयब्दीपूर्ती — —
१५) भारतातील श्री साईमंदिरे — —
१६) त्रिकालज्ञ श्री बाबा — श्री. बाळकृष्ण देसाई
१७) पूर्ण विचारांनी साईनाथच श्रेष्ठ — सौ. सुनिता चावक
१८) साई धर्म — श्री. ग. दे. कुलकर्णी
१९) ग्रंथपरिक्षण, गायत्री मंत्र — —
२०) श्रीरामकृष्ण परमहंस व श्री साईबाबा — श्री. मु. ब. निंबाळकर
२१) मी प्रथम साईबाबांची केलेली आरती — श्री. नंदकुमार बेलवलकर
२२) शुभकामना संदेश — श्री. अशोक म्हात्रे
२३) दृढभावे साईभजता — श्री. रमाकांत पोंगुर्लेकर
२४) असेल का ती साईमाऊली — सौ. अस्मिता देशपांडे
२५) मस्तक ठेवितो साईपायी — श्री. वामन वेंगुर्लेकर
२६) जेथे साईनाम — श्री. अजित पावसकर
२७) साई गोड तुझे नाम — प्रा. भा. पुं. आडारकर
२८) साईनाथा — श्री. दत्ता कदम
२९) साईलीला एकसष्ठी — श्री. बाळासाहेब नाडकर्णी
३०) बाबा, तुम्हीच साईराम — श्री. प्रकाश परब
३१) प्रभो साईनाथा — सौ. शा. शां. दळवी
३२) शिरडीवृत्त — मार्च १९८२

स. न. वि. वि.

# जीवन सहलीतील मार्गदर्शक भगवान श्रीसाईबाबा




जीवन हे दुःखदायक अगर दुर्दैवाची परवड आहे अशा दृष्टीने त्याच्याकडे बघून उपयोग नाही. कुणीही जरी झाले तरी त्याला मृत्यू हा निश्चितच आहे. स्वतःला न समजणाऱ्या किंवा न रुचणाऱ्या, न पटणाऱ्या गोष्टीवरुन जीवनात निरुत्साही निष्कारण रुखरुख करीत बसण्यात काहीच अर्थ नाही.

आपण सहल करण्यास निघतो त्याच दृष्टीकोनातून जीवनाकडे पाहिल्यास बरे होईल. सहल आपण आनंदाकरिता काढतो खरे परंतु सहलीत आनंदापेक्षा त्रासच होतो, अडीअडचणी येतात. तशाच अडचणी आपल्याला जीवनात पण येतात. पण सहलीत त्रास अडीअडचणी येऊन सुद्धा एक प्रकारचे उत्साही वातावरण निर्माण होते तसेच वातावरण जीवनातही आले पाहिजे. सहलीच्यावेळी अनोळखी विभागात त्या विभागाची पूर्ण माहिती असलेल्या वाटाड्याची जशी जरुरी भासते अगदी तशीच हा संसाररुपी सागर सुखा-समाधानाने तरून जाण्यासाठी वाटाड्याची, मार्गदर्शनाची अत्यंत जरुरी असते.

विद्यासंपादन करणे हा जीवनातील पहिला टप्पा होय. त्यासाठी सुविद्य गुरूची जरुरी असते. तसेच संसार सागर सुखासमाधानाने तरुन जाण्याच्या दुसऱ्या टप्प्यासही साधुसंतांच्या सारख्या सद्गुरुची जरुरी असते.

जीवनातील हा दुसरा टप्पा ओलांडून जाण्याच्या बाबतीत मानव इतका बेफिकीर किंवा संसारात गुरफटून गेलेला दिसून येतो की कालपर्यंत त्याला या गोष्टीच विचारही करण्यास वेळ मिळत नाही.

सोडलेला बाण, वाहून गेलेले पाणी, बोलून गेलेला शब्द आणि निघून गेलेले आयुष्य परत येत नाही हे प्रत्येकाला कळते. पण हे कटू सत्य उशिरा सुचण्यात काय अर्थ आहे ? उतार वयात रूक्ष वाळवंटाच्या किनाऱ्याला येऊन पोहोचल्यावर दुर्दैवी प्रवाशासारखी स्थिती झाल्यावर तेथून परत मागे फिरेन म्हटले तर ते शक्य होणार आहे काय ! पण अशाही परिस्थितीत कण्हत, कुंथत तडफडत आणि मागे आशा

ठेऊन पैलतिरी जाण्यात तरी काय अर्थ आहे ? आणि म्हणूनच आधीपासूनच पैलतिरी जाण्याचा सुलभ आणि सुखकर मार्ग तयार करून ठेवणे जरुरीचे आहे.

या दुसऱ्या टप्प्याचे मार्गदर्शन करणारे वाटाडे म्हणजे साधुसंतांसारखेच गुरु होत. या अशा गुरूंच्या बाबतीत संत तुकाराम महाराज म्हणतात–



सद्गुरू वाचोनी सापडेना सोय। धरावे ते पाय आधी त्याचे।
लोह-परिसाची न राहे उपमा। सद्गुरु महिमा अगाधची।
तुका म्हणे ऐसे आंधळे जन। गेले विसरोन खऱ्या देवा।

सद्गुरु आणि साधुसंत कसे असावेत यासंबंधी तुकाराम महाराज आपल्या दुसऱ्या एका अभंगात म्हणतात—

अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ। त्याचे गळा माळ असो नसो।
आत्मा अनुभवी चोखाळल्या वाटा। त्याचे माथा जटा असो नसो।
परद्रव्य अंध निंदेसी जो मुका। तोचि संत देखा तुका म्हणे।

तेव्हा वरील एकंदर गोष्टींचा विचार केल्यास आधुनिक काळात संसारी जीवन सुखासमाधानाने तरून जाण्यास श्री साईबाबांच्या चरणी श्रद्धेने व भक्तीभावाने लीन होणे हाच एक मार्ग आहे. कारण भगवान श्रीसाईबाबा हयात असताना आणि समाधिस्थ झाल्यावरही त्यांच्या असंख्य भक्तांना जे विविध अनुभव आले व त्यांचे मार्गदर्शन झाले त्यावरून असे सिद्ध होते की साईबाबा सर्वश्रेष्ठ परमात्मा आहेत. त्यांची श्रद्धापूर्वक मनोभावाने भक्ती करणाऱ्या सर्व भक्तांचा भार ते वाहतात. ते आपल्या एका वचनात म्हणतात —

साई म्हणे तोची, तोची झाला धन्य। झाला जो अनन्य माझ्यापायी।

तेव्हा श्री साईबाबांच्या चरणी श्रद्धापूर्वक भक्तीभावाने लीन झाल्यास, जीवनातील सुलभ आणि सुखकारक मार्ग खात्रीने दिसतील यात मुळीच शंका नाही.

भगवान श्रीसाईबाबाच आपल्या जीवन सहलीतील खरेखुरे मार्गदर्शक आहेत वाटाडे आहेत.

★

Which of these three novels on SAI BABA will you adjudge as the best?

**"A MISSION DIVINE!"** Rs. 45/-

**"मशिदीत प्रगटला परमेश्वर!"** Rs. 36/-

**'प्रगटे मस्जिद में साई भगवान!'**

Publishing soon:

The answer will be unanimous! ALL THE THREE! Indeed thay are all beautiful–' thrilling, moving, captivating, incomparable! 'That's the verdict of readers. Not ours.

Postage Rs. 4–50 each.

**PRASHANTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments, 47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W), Bombay 400 092.**

Soon in beautiful HINDI too!

# श्री माताजी मैयाजी महाराज

—श्री. गणपतराव सामंत एम्. ए.
व्यवस्थापक श्रीमहालक्ष्मी मंदिर मुंबई २६

● गेली तीस वर्षे मी श्री माताजी मैयाजी यांचे नाव ऐकत आहे. अनेक सत्पुरुषांच्या दर्शनाचा लाभ मिळाला पण श्री मात्ताजी मैयाजी यांच्या दर्शनाचा योग आला नाही. तीन महिन्यापूर्वी श्री मैयाजी महाराज आमच्या श्रीमहालक्ष्मी मंदिरात माताजीचे दर्शन घेऊन गेले. त्याचवेळी मंदिराचे मुख्य पुजारी यास त्यांनी श्रीगणपतीची मूर्ति काढून दिली. त्याच दिवशी मी बाहेर गेल्यामुळे दर्शनाचा योग आला नाही.

दर्शनाचा योग डिसेंबर ८१ मध्ये आला. अंगात संचार झाल्यावर डोळे मिटले जातात व नंतर महाराज प्रत्येकाची अडचण सांगून बोलावतात, उत्तर सांगतात, उपाय सुचवितात व संसारी माणसांना मार्गदर्शन करून त्यांचे प्रश्न सोडवितात. त्यांना प्रश्न विचारावा लागत नाही तर त्यांच्या दर्शनास जाताना प्रश्न आपण आपल्या खिशात लिहून ठेवायचे व आश्चर्याची गोष्ट म्हणजे महाराज त्या प्रश्नांची क्रमशः उत्तरे देतात. असे अनेक चमत्कार मी ऐकत होतो व या चमत्कारांचा अनुभव घेण्याचे सुवर्णक्षण गेल्या डिसेंबरात आले.

मी त्यांच्या दर्शनास गेलो. महाराज बाहेरून आले व लगेच संचार झाला, बऱ्याच जणांची प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली. मलाहि आश्चर्य वाटले. माझी पाळी आली. मला त्यांनी बरोबर पत्नी व मुलगा आहे त्यांना बोलावावयास सांगितले. माझा प्रश्न नव्हता. मला आशिर्वाद लाभला. नंतर माझ्या पत्नीस म्हणाले तुझ्या मोठ्या मुलाविषयी प्रश्न आहे. तो तुझ्याबरोबर आलेला नाही व तुझ्या प्रश्नाचे उत्तर अमूक आहे. नंतर लहान मुलगा बरोबरच होता. त्यास म्हणाले तुझे दोन प्रश्न आहेत. पहिल्या प्रश्नाचे उत्तर हे व दुसऱ्याचे हे असे सांगून आम्हाला आशिर्वाद दिला. आश्चर्य वाटते की प्रश्न न विचारता प्रश्न सांगून उत्तरे सांगणे. आम्ही निघण्यापूर्वीच मुलाने दोन प्रश्न लिहून खिशात ठेवले होते व पत्नीने एक प्रश्न लिहून ठेवला होता. नंतर बराच वेळ आम्ही तेथे होतो व त्यांचे अनेक चमत्कार पाहिले. व्यक्तीना नाव

घेऊन हाक मारणे व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे. उपाय सुचविणे या सर्वच गोष्टीवरून महाराजांच्या दिव्यत्वाची जाणीव होते.

दुसरे दिवशी ते मुंबईहून इंदोरला जावयास निघाले. त्यांच्याबरोबर मी व माझे भक्तिमार्गातील मित्र श्री. शरद गाळवणकर, श्री. जाधव मास्तर वगैरे मंडळी होतो. स्टेशनवर गाडी सुटेपर्यंत महाराज बरेच चमत्कार करतील व तेहि संचार नसताना असे माझे मित्र म्हणाले व या म्हणण्याचा प्रत्यक्ष अनुभव मी मुंबई सेंट्रल स्टेशनवर अर्धा तास घेतला. माझी ओळख तेथेच झाली. मला त्यांनी त्यांच्या गळयात असलेल्या हारातल्या फुलातून एक बारीक पाकळी काढून दिली व खिशात ठेवायला सांगितली. माझे मित्र म्हणाले पाकळी जपून ठेवा. पाकळी गुंजेएवढी नाजूक होती. थोड्या वेळाने मित्रांच्या सांगण्यानुसार पाकळी खिशातून काढण्यासाठी हात घातला तर आश्चर्य असे की पाकळीऐवजी एक सुंदर सुवर्ण रंगाची मुद्रा. एका बाजूस ॐ व दुसऱ्या बाजूस श्रीलक्ष्मी. आश्चर्याचा धक्काच बसला.

महाराज अंगात शर्ट घातल्यावर एक पूर्ण जुने असे काळे जाकिट घालतात. त्या जाकिटाला स्पर्श करून मला हात पुढे करण्यास सांगितले व त्यांच्या हातातून एक मोठा पेढा माझ्या हातावर प्रसाद म्हणून मिळाला. लगेच खिशात हात घालून चिमटीतून दोन–चार साखर फुटाणे काढले ते सर्व मला दिले व त्याच हाताने महाराजांनी सर्वांस तोच प्रसाद दिला. जवळ जवळ तीस माणसांना प्रसाद देऊन आणखी कोणास हवा आहे काय याची चौकशी केली. गर्दीतून चार माणसे आली त्यांना प्रसाद दिला व नंतर कोणीहि प्रसादासाठी उरले नाही हे पाहून तोच हात त्यांनी माझ्यासमोर धरला. हातात काहींही नव्हते. फक्त एकदाच खिशात हात घालून दोन चार फुटाणे बाहेर काढून परत खिशात हात न घालता पन्नास माणसाना प्रसाद पुरवायचा म्हणजे सामर्थ्य हवे.

गाडी सुटण्याची वेळ झाली. हसत हसत आम्हास म्हणाले पेढे येत आहेत पेढे येत आहेत–सर्वांनी प्रसाद घ्या असे म्हणता म्हणता थोड्याच वेळात खरोखरीच एकजण पेढ्यांचा मोठा बॉक्स घेऊन आला व त्यांनी सर्वांस पेढे वाटले.

महाराज, नेहमी प्रसन्नवदन असतात. पांढरेशुभ्र धोतर, शर्ट, वर काळी बंडी व डोक्यावर तांबडा फेटा हा नेहमीचा त्यांचा पेहराव.

गाडी सुटण्यापूर्वी त्यांनी आपल्या गळयात असलेल्या हारातून प्रत्येकास एक फूल काढून दिले. प्रत्येक फुलास गुलाब अत्तराचा घमघमाट. त्यांच्या मनात असेल तर गाडीसुद्धा थांबते असा बऱ्याच लोकांचा अनुभव आहे.

अनेक सिद्धी प्राप्त असल्यामुळे ते सिद्ध पुरुष आहेत असे मी म्हणत नाही. आपल्या सिद्धीने अनेकांचे प्रश्न सोडविणे, संसारिकांना मार्गदर्शन करणे, उपचार सांगणे असे लोकोपयोगी कार्य त्यांचे सतत चालू असते व म्हणूनच त्यांना सत्पुरुष म्हणावे लागते.

अनेक संतानी चमत्कार केले. सामान्य माणसांचे प्रश्न सोडवले हे आपण ऐकतो व विश्वास ठेवतो. पण ज्यावेळी या गोष्टी स्वतःस अनुभवण्यास मिळतात त्या वेळी विश्वास बसतो. असे संत होऊन गेले व आताही आहेत. पण अशा सध्या असलेल्या संतांविषयी आपण स्वार्थबुद्धीने प्रसिद्धी करीत नाही कारण आपण एक-ट्यानेच फायदा घ्यावा ही वृत्ती.

सध्याच्या स्फोटक परिस्थितीत आपणास दैवी वशिला असल्याशिवाय जगता येणार नाही, व असे दैवी संत मी सर्व साईभक्तांसमोर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. लोकांचे अनुभव वाचून एखाद्या संताविषयी लिहिणे चुकीचे ठरेल म्हणून स्वतः अनुभव घेऊन मग लिहिणे हेच मला योग्य वाटते.

एखादा सत्पुरुष जर नुसते चमत्कार करीत असेल तर आपण त्याना सिद्ध म्हणू एवढेच. पण जर तो चमत्कार करून लोकोपयोगी कार्य करीत असेल तर भक्त-गण अशा या सत्पुरुषाचे पाय धरणारच. आपणास संसारात संकटे असतात, प्रश्न असतात व यासाठी जर सत्पुरुषाने मार्गदर्शन केले, व्याधि नाहीशी केली, प्रश्न सोड-विला तर अशा या सत्पुरुषामुळे भक्त जास्ती भक्तिमान होतील व याच तऱ्हेचे सिद्ध सत्पुरुष म्हणजे श्री मैयाजी महाराज होत.

श्री मैयाजी म्हणजे एक चालते-बोलते नवचैतन्य. संचार होताच डोळे मिट-तात व अस्खलित संभाषण चालू होते. व्यक्ति समोर बसताच त्याचे काय प्रश्न आहेत ते लगेच सांगून उत्तरे दिली जातात. हा कार्यक्रम चालू असताना बऱ्याचजणांना नावाने ते हाक मारून बोलावतात.

त्यांच्यात संचार साधारण अर्धा-एक तास असतो व संपायचे काही क्षण असता ज्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळायची आहेत अशा किती व्यक्ति शिल्लक आहेत तो आकडा सांगतात. संचार नसतानासुद्धा मी त्यांचे अनेक चमत्कार पाहिले—अनुभवले.

समाधिस्त झालेल्या साधुसंतांनी चमत्कार केल्याचे आपण वाचतो-विश्वास ठेवतो म्हणूनच हा विश्वास वाढण्यासाठी अस्तित्वात असलेल्या साधुसंताविषयीं सर्व भक्त-जनांना माहिती देणे मला योग्य वाटते.

आजच्या या भयानक परिस्थितीत सत्पुरुषांच्या सहवासाशिवाय आपण जगू शकणार नाही. दररोज निर्माण होणाऱ्या 'बाबांच्या' मागे न धावता जागृत मंदिरे किंवा श्रीमैयाजी महाराजांसारखे सत्पुरुषांचे दर्शन हितावह ठरेल.

श्री मैयाजी एक उत्कृष्ट शेतकरी असून ते मारवाडी जातीतील आहेत. संचार झाला असताना त्यांची भाषा मारवाडी असते व ती स्पष्ट करून सांगण्यासाठी एक सहाध्यायी असतो. अशावेळी तेथे थांबण्यास वेळ नसतो. भराभर उत्तरे ते सांगत असतात. उपाय सुचविले जातात. उत्तरे स्पष्ट असतात. गेल्या भेटीत त्यांनी श्री महालक्ष्मी मंदिरात येण्याचे मला वचन दिले आहे. मात्र नक्की तारीख सांगता येणार नाही.

असे हे थोर संत सर्वांस तारक होवोत महाराजांचा पत्ता खालीलप्रमाणे. पत्रोत्तर हवे असल्यास सोबत जोडकार्ड असावे ही व्यावहारिक सूचना.

श्री माताजी मैयाजी महाराज
मु. नैनोद–इंदोर, मध्यप्रदेश

श्रीसाईलीला ६० व्या निमित्याने

# परमहंस श्री मुक्तानंद बाबांचा संदेश

ॐ श्रीगुरुदेव

श्रीसाईलीला मासिकाची षष्ट्यब्दिपूर्ति आपण साजरी करीत आहोत ही आनंदाची गोष्ट आहे.

श्रीसाईबाबा आणि माझे सद्गुरु नित्यानंद यांना मी एकरूपच अनुभवतो. साऱ्या जगांत मी जिथे जिथे गेलो तिथे तिथे श्रीसाईबाबांचे हजारो फोटो लावले शिर्डी संस्थानातही अलीकडे बांधण्यात आलेल्या बऱ्याच इमारतींच्या कोनशिलांवर आपणास माझे नाव दिसून येईल. मी भारतात असलो म्हणजे माझी दरवर्षांची शिर्डीची यात्रा कधी चुकली नाही आणि यंदा पण ती चुकणार नाही. शिर्डीचा आणि माझा असा भक्तिपूर्ण जिव्हाळा असल्यामुळे श्रीसाईबाबांचे अद्भुत चरित्र हजारो भक्तांना नियमित पुरविणाऱ्या साईलीला मासिकाची वाटचाल पाहून मला फार आनंद वाटतो. श्रीसाईबाबांच्या लीलेप्रमाणेच ही साईलीला देखील अखंड चालू राहो ही सद्भावना.

—मुक्तानंद

# मौन, मौनी आणि मनःशांती

—प्रा. र. श्री. पुजारी

रमा निवास, ९९२ सदाशिव पेठ,
पुणे–३०

● मौन म्हणजे ओठांचे केवळ मिटलेपण नव्हे. अनेकविश्व मनोव्यापारांचा लय एका आत्मचिंतनात होणे म्हणजे मौन.

मौन वरवरचे असू शकेल किंवा गाढही असू शकेल. प्रकृतीच्या अनुषंगाने मौनाचे गाढपण गडदही होऊ शकेल. हा प्रश्न केवळ अभ्यासाचा नाही. ईश्वरी कृपेचाही आहे. बाहेरची धाव असणारे मन एका जागी स्वस्थ बसल्याशिवाय ही गोष्ट साध्य होणारी नाही.

केवळ रानावनात जाऊन, निर्जनस्थानी राहून किंवा देहास अंधाऱ्या खोलीत कोंडून ही गोष्ट साध्य होणारी नाही. सत्संगाचे खतपाणी घालीत राहिल्यामुळेच ही स्थिर अवस्था हळूहळू प्राप्त होणारी आहे.

कमी बोलणारी माणसे सामान्यतः अधिक चिंतनशील आढळतात. चिंतनशील प्रवृत्तीची माणसेही सामान्यतः कमी बोलतात. यावरून मौनाचे कारणरूप साधन किंवा माध्यम वाणीच आहे हे सिद्ध होते.

वाणी ही अमोघ शक्ती अग्नीप्रमाणेच उपकारी आणि अपकारीही आहे. बाहेरची धाव वाणीच वाढविते. तिला डोळे, कान फार काय, हातपायही साहाय्यभूत होतात. एखाद्या उनाड मुलाने प्रचंड उद्योग म्हणून बाहेरील कचरा आपल्या घराच्या सोप्यावर आणून रचावा तसे कार्य वाणी अखंड करीत राहाते.

नटनटींची वर्णने, त्यांचे जीवनेतिहास, द्वेषमत्सरादी व्यापारांचे साद्यंत वृत्त, थोडक्यात म्हणजे बाहेर जे जे घडत असते ते ते सर्व काही वाणी मनाच्या सोप्यावर आणून रचते. हा सर्व उकिरडाच मन नेहमी चिवडीत राहते. उकिरड्यात आपणास काही लाभेल या आशेने एखादे आशाखोर मनुष्य उभा उकिरडा चिवडत राहातो अशातील हा प्रकार होतो. अंती मनास उद्विग्नता येते.

मनास उद्विग्नता आली तरी सत्संगाशिवाय वैराग्य येत नाही. काचा आणि हिरे यांचे मूल्य एकच आहे असे वाटते. जे जे दिसेल ते मनुष्य पदरात बांधून घेतो. कोणताही निर्णय ठाम होत नाही. अविवेकी लोक उथळपणे जे बोलतात त्याचाच सूर धरला जातो. त्यांच्या मुखातील घोषणेचा अनुवाद न कळतच आपले जीवन व्यापून राहातो.

ज्या क्षणी मनुष्य आपले तोंड बंद करतो त्याच क्षणी त्याच्या मनाचे दार उघडते. आतील केरकचऱ्याची हकालपट्टी होऊ लागते. विवेकाचा दिवा मनात लागतो. त्याच्या प्रकाशात आतील प्रत्येक वस्तूचे मूल्य कळू लागते. अंती विचारांचे भांबावलेपण जाऊन आपल्या गाडीची वाट पाहात रस्त्याच्या कडेस उभ्या असलेल्या माणसाप्रमाणे तो स्थिर होतो.

माणसास सुविचार कोठून गोळा करावे लागतात असे नाही. गोळा केलेले आणि तोंडपाठ केलेले सुविचार त्याला फारसे उपयोगीही पडत नाहीत. ते त्याचे त्यालाच मनाच्या एकांतात लाभतात. झाडाला यथावकाश पाने, फुले आणि फळे यावी त्याप्रमाणे त्या त्या प्रसंगी ते ते विचार त्याच्या मनाला मार्गदर्शन करतात. यामुळे मौन वर वर अबोल वाटले. तरी मौनी मनाची निर्णयशक्ती मोठी असते. त्याचा शब्द रामबाण ठरतो. त्याचा विचार मनाच्या अढीत पूर्णपणे पिकल्यामुळे तो पक्क असतो. असा पक्क विचारच वाचाशूराना एका क्षणात नामोहरम करतो.

महात्मा गांधींसारखा फारसे ग्रंथ न वाचलेला एखादा मौनी फकीर मोठमोठ्या पंडितांनाही त्यांच्या विचारातील ठिसूळपणा दाखवून क्षणात दिपवून सोडतो. याचे कारण असे की कागदी ग्रंथ टाकून विराट जीवन ग्रंथ केवळ मौनात राहिल्यामुळे वाचावयास तो शिकतो.

मौन आणि एकांत यांचा संबंधही निकटचा आहे. लोकांच्या गर्दी गोंगाटात राहूनही एखादा मनाने मौनी राहून हाती असलेले काम करीत असतो. अशा व्यक्तीच्या कर्मात हळूहळू निर्मळपणा निर्माण होतो. शांत मनाने केवढ्याही मोठ्या कार्यास सतत तोंड देणारी धिम्या वृत्तीची माणसे या प्रकारची असतात. शब्दांचे मोजकेपण आणि वाणीचे सौम्यपण हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष असतात.

मौन हा भारतीय धर्मपंथातील एक अविभाज्य विशेष आहे. मौन आणि उपवास यांची सांगडही घातली आहे. मौनाचे महत्व प्रार्थनेइतकेच मानण्यात आले आहे. मौनामुळे चित्तशुद्धीस चालना मिळते हेही एक सिद्ध झालेले तत्व आहे.

शुद्ध मौनामुळे मनःशांतीची प्राप्ती होते. याचे कारण असे की अनेकविध बंधनानी बांधलेले मन बंधनमुक्त होऊन केवळ सत्यरूप ईश्वरचरणी राहाते.

नामाचा आणि मौनाचा संबंध फार निकटचा आहे. मौनातच मन हरिनाम घेण्यास शिकते. मौनाची गाढता जसजशी वाढते तशी नामाची खोलीही वाढत जाते. हरिनाम रक्तात मुरते. निदिध्यास म्हणतात तो प्राप्त होतो. मन दुःखमुक्त होते. आनंदाचा झरा त्याला मनातच लाभतो.

जनसंमर्दात असूनही संत केवळ मौनामुळेच आनंदात असतात.

शुभ विवाहासाठी लागणाऱ्या

**A to Z वस्तू**

दादरमध्ये मिळण्याचे ठिकाण म्हणजे

# रमेश एम्पोरियम

बाशिंग-मुंडावळीचे मोठे व्यापारी

४५, किर्तीकर मार्केट, डॉ. डिसिल्व्हा रोड, दादर, मुंबई ४०००२८

# काशीला खुद्द बाबांनी पिंड हाती घेतले !

—श्री. ग. वा. उर्फ नानासाहेब जोशी
चिटणीस श्री उपासनी कन्याकुमारी स्थान
साकुरी, जि. अहमदनगर

● सटाणे ( ता. बागलाण, जिल्हा नासिक ) येथील उपासनी घराणे व शिर्डीचे साईबाबा यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध होते. वास्तविक उपासनी हे शास्त्रीय घराणे. त्यांना म्लेंछांबद्दल घृणा असणारच. कोणत्याहि धार्मिकाला 'आपलाच धर्म खरा इतरांचा वाईट' अशा अर्थाचे बाळकडू लहानपणापासून देण्यात येते. तथापि कारण परत्वे पुष्कळ वेळा या द्वेषास मुरड घातली जाऊन भिन्न धार्मिक एकत्र येऊन सलोख्याने व्यवहार करतात. साईबाबांचा निदान पेहराव तरी फकीरी बाण्याचा असल्याने लेखक त्यांचेकडे मुळीच जाण्यास तयार नसे. सामान्यतः चमत्काराशिवाय नमस्कार नसतो. याबाबत साईबाबांचे एक दोन चमत्कार लिहीले आहेत.

श्री उपासनी महाराजांचे थोरले बंधू महामहोपाध्याय बाळकृष्ण गोविंद उपासनी हे पुण्यास असताना इ. स. १९०५ साली काशीस अखिल हिंदुस्थानातील (त्यावेळी भारत–भारतीय हे शब्द प्रचारात नव्हते ) संस्कृत परिषद भरली होती. पुण्यातील काही पंडीतांबरोबर उपासनी शास्त्री यांनाहि आमंत्रण असल्याने त्यांनी काशीस जाण्याचे ठरविले. त्यावेळी प्रवासाची साधने हल्ली इतकी विपुल प्रचारात नव्हती. दूरवर यात्रेला जाणे सामान्य माणसाला क्वचितच घडत असे. काशीहून परत येताना गयेला जावे तसे त्रिवेणी संगमावर तीर्थश्राद्ध करुन यावे असे निघण्यापूर्वी शास्त्रीबुवांनी ठरविले होते.

काशीतील संस्कृत संमेलन संपताच ठरल्याप्रमाणे उपासनी शास्त्री गयेला गेले. तेथे त्रिवेणी संगमावर श्राद्ध विधि यथासांग करण्यात आला. विधि आटोपताच ताम्हाणात पिंड घेऊन जरा बाजूला प्रवाहात पिंड सोडण्यास गेले. पिंड धारेत सोडताक्षणीच दोन हात प्रवाहाच्या त्या पातळीवर येऊन ते पिंड तळहातावर घेऊन खाली खोल पाण्यात अदृश्य झाले. ति. दादांना ( शास्त्रीबुवांचे टोपण नाव ) अत्यंत आश्चर्य वाटले. थोडी भीतीहि वाटली. आनंदहि झाला.

रोज खाण्यास पिंड मिळत असल्याने पुष्ट बनलेले मासे पाण्याच्या पातळीवर येऊन पिंडावर झडप घालतात हे जरी खरे असले तरी आपणांजवळ मासे न येता

दोन हातच वर आले व आपण ताम्हणातून पिंड सोडताच ते घेऊन प्रवाहाबरोबर न जाता त्याच ठिकाणी पाण्यात खोल खोल जात असलेले आपण प्रत्यक्ष सकाळी ११ १२ च्या सूर्यप्रकाशात पाहिले. असे ति. दादा सांगत. पुढे ही सत्य घटना अनेकवेळा ते त्याच्या शास्त्रीय भाषेत प्रसंगाने रंगवून सांगत.

नंतर ५–७ वर्षांनी इ. स. १९१२ सालात ति. दादा श्री उपासनी महाराजांना भेटण्यास शिर्डीस आले. त्यांना खंडोबाचे देवालयात जायचे होते; परंतु बरोबरच्या काही मंडळीबरोबर ते सहज मशिदीत द्वारकामाईत साईबाबांकडे आले. ति. दादांना बघताच, 'का रे बामना, आलास व्हय ? लई दिवसांनी भेटलास बघा' असे साईबाबा म्हणाले. 'आपण तर प्रथमच आज शिर्डीस आलो. यापूर्वी साईबाबांना कोठे पाहिले असावे ?' असा मनात विचार दादा करताच, 'अरे, इचार काय करतोस ? अरे, मोठ्या महादेवाच्या गावाला तुम्हा पंडीत लोकांची सभा होती ना तू तेथे गेला व्हतास. सभा संपल्यावर तू गयेला जाऊन तीन नद्यांच्या संगमावर बापजाद्यांना पिंड दिलेस का ? अरे ते पिंड ह्या हातांनी (स्वतःचे दोनहि हात पुढे करून) घेतलेस नव्ह का ? आठवतं का ?' हे साईबाबांचे शब्द ऐकताच सद्‌गदीत अंतःकरणाने दादांनी साईबाबांना साष्टांग नमस्कार घातला; साईबाबांनी त्याच्या पाठीवर हात फिरवून उठवले. अश्रूपूर्ण नयनांनी दादा हात जोडून उभे राहिले. बरोबरचे लोक साईबाबांच्या या लीलेचे आश्चर्याने कौतुक करीत होते. जवळच उभ्या असलेल्या म्हाळसापतीला साईबाबा म्हणतात, 'अरे या पंडिताला विठोबाच्या देवळात (खंडोबाला साईबाबा विठोबा म्हणत) त्या उपासनीकडे घेऊन जा' दादांनी साईबाबांना नमस्कार करून म्हाळसापतींबरोबर झालेल्या सर्व घटनांचे मनन करीत खंडोबाचे देवळाकडे गेले.

☆

# श्री साईपरिवार वृत्तविशेष

● उल्हासनगर येथे ता. ११–४–८२ रोजी सायं. ५ वा. श्री साईबाबांच्या मूर्ती–प्राणप्रतिष्ठा व बाबांच्या मंदिराचे उद्‌घाटन चित्रपट कलावंत श्री. मनोजकुमार व श्री. शत्रुघ्न सिन्हा यांचे शुभहस्ते करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. व्ही. एस. देशपांडे समारंभाचे अध्यक्षस्थानी होते.

● श्री साईलीला मासिकाचे लेखक श्री. दिलीप शंकरराव लांडे यांचा विवाह २१–३–८२ रोजी अकोला येथे संपन्न झाला. वधूवरांचे अभिष्ट चिंतन.

● श्री साईलीलाचे लेखक–कवी श्री. नागेश दिवाकर, पुणे यांची कन्या चि. सौ. कां स्वाती हिचा विवाह दत्तात्रय कुलकर्णी यांचे चिरंजीव श्री. महेशकुमार यांचेशी मंगळवार ता. २७–४–८२ रोजी श्रीमंगलकार्यालय शनिवार पेठ, पुणे येथे थाटात पार पडला. वधूवरांचे अभिष्टचिंतन.

# श्रीसाई हे परमेश्वराचे प्रेषित कसे ?

• • • • • • •

—श्री. पां. वा. भुतकर
२३।१६७५ अभ्युदयनगर, काळाचौकी मुंबई ३३

● आपण जो परमेश्वर मानतो तो देहातीत असतो. निराकार असतो. जन्म मरणाच्या यातायातीतून मुक्त असतो. जनकल्याणाकरीता हे परमेश्वराचे प्रेषीत पृथ्वीतलावर उतरत असतात. ज्यावेळी जनसामान्यांना कोणीतरी दिशा दाखविणारा हवा असतो व परमेश्वरालाही लोकांची गरज समजते अशाच वेळी पृथ्वीवर संत अवतरत असतात. जन्म व मरण हे लौकीक अर्थाने वापरले जाणारे शब्द त्यांच्याबाबतीत निरर्थकच उरतात. ते स्वतःच मृत्युंजय असतात.

संत मुळीच गर्भातीत ।
परोपकारार्थ प्रगटतात ।
ब्रह्मस्वरूप मूर्तीमंत ।
भाग्यवंत अवतरती ॥ ७५ ॥

साईबाबांच्या बाबतीत हे वर्णन सर्वार्थाने योग्य ठरते. श्रीसाईबाबा यांच्या जन्माबाबत आजतागायत कोठेच पुरावा उपलब्ध नाही. ते स्वयंभू निंबाच्या वृक्षतळी प्रगट झाल्याचा उल्लेख सर्व ठिकाणी आढळतो.

दुसरी गोष्ट म्हणजे ज्यांनी जन्मच घेतला नाही त्यांचे मरण कसे शक्य आहे ? ते जन्म मरणाच्या फेऱ्यातून विमुक्त झाले होते. जे अनाकलनीय आहे, जे असीम आहे व जे अगम्य आहे त्याचेच नाव श्रीसाई ! त्यांचे कार्य संपल्यानंतर ते अव्यक्तात मिसळून गेले. अनंतात विलीन झाले.

वास्तविक पहाता ज्याप्रमाणे अव्यक्त परमेश्वराला माणूस विठोबा, राम, कृष्ण वगैरे स्वरुपात पहातो त्याप्रमाणेच साईबाबा हेही एक स्वरुप आहे. अव्यक्ताची पूजा करणे ही गोष्ट महाकर्म कठीण ! पूजा करण्यास सुलभ जावे म्हणून कोणत्यातरी स्वरुपात ती दृष्य करणे आवश्यक ठरते. देवांची असंख्य रुपे ही अशीच झाली.

साईबाबांच्याबद्दल बोलावयाचे झाल्यास त्यांनी देखील त्यांच्या भक्तांना श्रीराम, विठोबा, वगैरे देवांच्या किंवा घोलपगुरुजी या गुरुच्या स्वरुपात दर्शन दिले याची प्रचिती साईसत्चरित्रामधून येते.

सर्वसाधारण मानवाला आपल्या मरणाची काहीच कल्पना नसते. देहाचे पतन हे त्याच्या बाबतीत नैसर्गिक आहे हे त्याला माहीत असते पण ते केव्हा याचा थांग-पत्ता मात्र त्याला नसतो. साईबाबांच्या बाबतीत ते ईच्छामरणी होते हे आपणास दिसून आलेच आहे. त्यांनी देहत्याग करण्यापूर्वी दोन वर्षे आधी याची कल्पना त्यांच्या भक्तांना दिलेली होती.

वरील सर्व गोष्टींचा आढावा घेता एक गोष्ट स्पष्टपणे आपल्या लक्षात येते ती ही की साईबाबा हे जन्ममरणापासून विमुक्त होते. जो जन्ममरणापासून विमुक्त आहे तो म्हणजे परमेश्वर! यावरून साईबाबा हे परमेश्वराचे प्रेषीत कसे याचा उलगडा होतो.

ह्या लेख पुरा करण्यापूर्वी वाचकांना शिर्डी येथे आरतीच्या वेळी म्हटले जाणाऱ्या सुंदर स्तोत्राची आठवण करून देतो.

सदा सत्स्वरूपं चिदानंदकंदं,
जगत्संभवस्थान संहार हेतुम् ।
स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयतं,
नमामीश्वरं सद्‌गुरं साईनाथम् ॥

सदा आपल्या खऱ्या म्हणजे ब्रह्म स्वरूपात असलेल्या, चैतन्य व आनंद यांचे मूळ असलेल्या जगाच्या उत्पती, स्थिती व लय याचे कारण असलेल्या व भक्तांच्या इच्छेखातर मनुष्यरूपाने प्रगट होणाऱ्या अशा साक्षात् ईश्वरच असणाऱ्या श्री सद्‌गुरू साईनाथांना मी प्रणाम करीतो.

★

## श्रीसाईकृपासाठी साहित्य पाठवा

गतसालाप्रमाणे श्रीसाईकृपा या वार्षिकाचा दिवाळी अंक प्रकाशित व्हावयाचा आहे तरी लेखक कवींनी लेख, कविता, चित्रे इ. मजकूर सौ. वर्षा विजय हजारे मा. व्यवस्थापिका कृपाशू प्रकाशन, सी/६ गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड, बोरीवली (पूर्व) येथे लौकरात लौकर पाठवावे अशी विनंती आहे.

जेवणे ही पटेना, त्यामुळे खूर त्रास होई. परंतु मी मात्र बाबांवर पूर्ण भरवसा ठेवून येईल त्या परिस्थितीला तोंड देण्यास तयार झालो.

एके दिवशी माझी आत्या आमच्याकडे दोन दिवस रहावयास आली होती. ती बाबांची निःसीम भक्त आहे हे मला ठाऊक होते. मी झोपताना हळूच तिच्या जवळ शिर्डीचा विषय काढला व मोठ्या काकांची परवानगी मिळवण्यासाठी मध्यस्थी कर, अशी तिला कळवळून विनंती केली. परंतु माझे आई-वडील बाहेरगावी असल्याने सारेच अशक्य होते. हे माहित असूनही मी तिची विनवणी चालूच ठेवली. मी तिला साफ सांगितले की, 'हे बघ विमल, मला भात खाण्याची किंवा मांस मच्छी खाण्याची इच्छा तर नाहीच उलट त्या पदार्थावरचे माझे मन पार उडाले आहे. परंतु मला शिर्डीला जाण्याची तळमळ लागली आहे' मी कळवळून आत्याला सारे सांगत होतो इतक्यात तिचे लक्ष माझ्या डोळ्याकडे गेले. माझ्या डोळ्यातील वाहणाऱ्या अश्रूधारा पाहून ती गहिवरली ! व मला म्हणाली, 'आता खूप रात्र झाली आहे. तेव्हा तू झोप उद्या मी सकाळी प्रयत्न करून पाहिन !' तिच्या आश्वासनामुळे मला बराच धीर आला मी विचार करीत करीत थोड्याच वेळात झोपी गेलो....

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून माझ्या आत्याने काकांची परवानगी घेतली व ह्या सुखद बातमीनेच माझी मंगल प्रभात झाली तिने मला उठवले व सांगितले की, 'जा एस. टी. स्टॅन्डवर तुला शिर्डीला जायचे आहे ना ?' मी लगेच उठलो व आंघोळ करून बाबांना मनःपूर्वक नमस्कार करून एस. टी. स्टॅन्डवर गेलो. सर्व एस. ट्या फूल होत्या कारण मुलांना नुकतीच दिवाळीची सुट्टी पडली होती परंतु बाबांची प्रेरणा असल्यावर काय अशक्य ?

सर्व तयारी करून मी शिर्डीस जावयास निघालो. एक एक क्षण उत्कंठा वाढवित होता. मनाला सुखवित होता की आता बाबांचे दर्शन होणार ! सर्व सामान घेऊन घरच्या सर्व वडिलधाऱ्या मंडळीना नमस्कार करून मी माझ्या धाकट्या काकाला सांगण्यास गेलो तोच त्याने मला एक श्रीसाईबाबांवर प्रसिद्ध झालेल्या दिवाळी अंकाची प्रत माझ्या हातात दिली. त्या मासिकाचे संपादक विजय हजारे यांनी तो अंक शिर्डीला काकरे साहेबांना देण्यासाठी माझ्या काकांकडे दिला होता. त्या मासिकाच्या मुखपृष्ठावरील बाबांचा फोटो पाहून मला काका म्हणाला, 'काय घाबरू नकोस. प्रत्यक्ष साईबाबा ह्या मासिकाच्या रूपाने तुझ्या बरोबर आहेत.' तो अंक घेऊन मी खाली उतरलो व स्टेशनकडे जाणारी रीक्षा थांबवली. त्या रीक्षामध्ये श्रीसाईबाबांचा फोटो पाहून मला काकांचे शब्द आठवले की साईबाबा तुझ्याबरोबर आहेत. ठरल्या

# श्री बाबांचा चमत्कार

**मोजू येतील पर्जन्य धारा। बांधू येईल मोटे वारा।**
**परंतु ह्या साईंच्या चमत्कारा। कवण्या मापारा मोजिल ॥**

—श्री. सुधीर मधुसूदन पितळे
पितळेवाडी हनुमान रोड
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

● असा एक अवर्णनीय चमत्कार नुकताच माझ्या बाबतीत घडला. सुमारे सहा महिन्यापूर्वी माझा धाकटा भाऊ शिरीष शिर्डीस जावयास निघाला त्याच्याबरोबर मला पाठवा म्हणून मी माझ्या वडिलांना परोपरीने विनवले. परंतु माझ्या पायास जखम झाल्याने वडिल मला पाठवण्यास तयार होईनात. वास्तविक मी सबंध मुंबईभर माझा पाय दुखत होता तरी फिरत असे मग शिर्डीस जाण्यास काय कठीण होते? परंतु वडिलांच्या आज्ञेविरुद्ध मी काय जाणार?

अखेर माझा भाऊ एकटाच शिर्डीला गेला. तो गेल्यावर मी अगदी रागाने बेभान झालो व आजपासून बेमुदत उपोषण चालू करायचे व शिर्डीला जाण्याची परवानगी मिळाल्यावरच जेवायचे असा निश्चय केला. परंतु माझ्या धाकट्या काकांनी माझी खूप समजूत घातली व मला ते म्हणाले, हे बघ सुधीर! बाबांना कुणी उपाशी राहिलेले आवडत नाही. तेव्हा तू उपाशी न रहाता कोणताही आवडीचा पदार्थ सोड. तेव्हा मी काकांचे ऐकले. परंतु भात खाणे फीश, मटण अंडी इ. आवडीचे पदार्थ खाण्याचे सोडले, व निर्धार केला की शिर्डीला गेल्याशिवाय वरील कोणताही पदार्थ खावयाचा नाही!

काही दिवसांनी मला एक स्वप्न पडले. श्री साईबाबांनी धुनीतून प्रगट होऊन मला आशीर्वाद दिला. तेव्हापासून मात्र माझी शिर्डीला जाण्याची उत्कंठा शिगेला पोहोचली. परंतु योगायोगाने काही दिवसातच माझ्या वडिलांची अहमदाबाद येथे बदली झाली, व आता मात्र माझी शिर्डीला जाण्याची आशा पार मावळली! इकडे भात मासे पदार्थ वर्ज्य केल्यामुळे मला कुणाकडेही जेवावयास जाता येईना. तशातच आईवडील अहमदाबादला गेल्यामुळे काकांकडे जेवावे तरी त्यांना त्रास होईल हॉटेलात

वेळेप्रमाणे आमची एस. टी. दु. १२ वा. मुंबईहून सुटली व सायं. ७ वाजता शिरडीला पोहचली. तो दिवस गुरुवारचा होता. मी प्रथम काकरेसाहेबांना भेटून तो दिवाळी अंक त्यांना दिला व नमस्कार केला. त्यांनी माझ्या जागेची व्यवस्था गुरुस्थानाजवळच केली. नंतर मला गुरुवारचा पालखीचा भव्य सोहळा पाहण्यास मिळाला. डोळ्याचे पारणे फिटावे असा तो सोहळा होता. माझा आनंद उतून चालला होता. श्रीसाईबाबांशिवाय कोणताही विचार मनात येत नव्हता. सारे जीवन साईमय वाटत होते. लवकरच शेजारती झाली. आरती झाल्यावर मी मला दिलेल्या खोलीत झोपावयास गेलो.

मी अगदी झोपाळू असल्याने व लवकर उठण्याची सवय नसल्याने तेथील एका वॉचमनला मला सकाळी काकड आरतीसाठी उठवण्याची विनंती करून दार लावून बिछान्यावर पडलो. पडताक्षणीच मला माझ्या घरच्या लोकांनी लगेच दुसऱ्या दिवशी कसेही करून मुंबईस परतण्याची जी सूचना दिली होती त्याची आठवण आली. कारण त्याच अटीवर मला परवानगी मिळाली होती! परंतु त्या विचाराने मी जरा बेचैन झालो कारण उद्या सकाळी मुंबईस परतण्याचे तिकीट न मिळाल्यास काय होईल? अनेक विचार मनात तरंगत होते परंतु मी प्रवासाने दमलो असल्याने लगेच झोपी गेलो!

कुणीतरी दरवाज्यावर जोराने थाप मारल्याच्या आवाजाने मला जाग आली मला वाटले की सकाळ झाली असेल व वॉचमन मला काकड आरतीसाठी उठवण्यास आला असेल म्हणून मी लगेच उठलो व थोडासा दरवाजा उघडून पाहिले तो एक व्यक्ती समोर उभी दिसली व तिने मला म्हटले की तुला मुंबईस जाण्यासाठी उद्याचे रीझर्वेशन पाहिजे आहे ना? मग हे घे! असे म्हणून त्याने मला दुपारच्या गाडीचे रीझर्वेशनचे तिकीट माझ्या हातात दिले. मी बाजूस खुंटीवर टांगून ठेवलेल्या पॅन्टच्या खिशातून पैसे आणून त्याला देण्याच्या आधीच ती व्यक्ती दिसेनाशी झाली. मी घाईघाईने कपडे चढविले. डोळ्यावर पाणी उडवले व मनगटावरील घड्याळाकडे पाहिले तो रात्रीचे २॥ वाजले होते. आश्चर्याने चकीत होत त्या व्यक्तीचा मागोवा घेत मी खोलीचे दार तसेच उघडे टाकून भर रात्री खूप फिरलो. पण ती व्यक्ती मला पुनः दिसली नाही.

'कारण ते होते प्रत्यक्ष बाबा.'

दुसऱ्या दिवशी सकाळी काकड आरती करून अभिषेक पूजा करून मी बाबांचा निरोप घेऊन एस. टी. स्टॅन्डवर आलो! व कंडकटरला रीझर्वेशन दाखवले. परंतु

माझ्या तिकीटाचा नंबर होता ४३ व बसमध्ये फक्त ४२ सीट होत्या. ते पाहून कंडक्टर संशयाने माझ्याकडे पाहू लागला. परंतु माझे रीझर्वेशन अस्सल व छापील होते त्यावर डेपोतील अधिकाऱ्यांच्या सह्या होत्या, सर्व काही होते. त्यामुळे मला प्रवेश देणे त्याला नाकारता येईना. अखेर अधिकाऱ्यांशी बरीच चर्चा करून मला प्रवेश दिला गेला व मी दुसऱ्याच दिवशी सुखरूप मुंबईला विलेपार्ल्यास पोहचलो. माझ्या घरातील मंडळीना काळजी लागण्यापूर्वीच मी घरी पोहचलो होतो. सर्व अनुभव घरातील लोकांना सांगताना शरीर रोमहर्षक झाले होते मन गहिंवरत होते. डोळ्यातून आनंदाश्रूंच्या नद्या वहात होत्या. मी सांगत होतो बाबांचा चमत्कार! सर्व लोक ऐकत होते.

## साईनिकेतनमधील रामनवमी उत्सव

सर्व साईभक्तांची इच्छा रामनवमीला शिरडीला जाण्याची असते. कारण साक्षात् बाबांनी सुरू केलेला हा उत्सव आहे. पण सर्वानाच शिरडीला जाणे शक्य होत नाही. ज्या ज्या ठिकाणी माझे भक्त आठवण काढतील त्या. त्या ठिकाणी मी उपस्थित असेन. या बाबांच्या आश्वासनानुसार ज्या भक्तांना शिर्डीस जाणे शक्य होत नाही ते आपल्या जवळ असलेल्या साईमंदिरात जाऊन बाबांचे डोळे भरून दर्शन घेतात; दादर येथील साईनिकेतनमध्ये रामनवमी ता. २–४–८२ रोजी सकाळी ९ वाजल्यापासूनच भक्तांची बाबांच्या दर्शनासाठी रांग लागली होती. दुपारी बरोबर बारा वाजता आरतीची वेळ असते हे लक्षात घेऊन बरेच भक्त त्या सुमारास आले. आरतीच्या पूर्वी म्हणजे १० वाजल्यापासून ह. भ. प. सौ. बेलिंग यांच्या रामजन्मावरील किर्तनाचा लाभ भक्तांना झाला. ते आटोपताच श्रीसाईलीला मासिकाच्या ६१ व्या वर्षाच्या पहिल्या अंकाचा छोटासा प्रकाशन समारंभ श्री साईलीला मासिकाचे उभय कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे व सदानंद चेंदवणकर यांनी केला व अंकाची प्रत श्री बाबांच्या चरणी ठेवली. आरतीनंतर भक्तांना प्रसाद वाटण्यात आला. दर्शनासाठी रात्री आठ वाजेपर्यंत कार्यालय उघडे ठेवण्यात आले होते.

# किल्यांचा चमत्कार

—सौ. विजया व. देसाई
३/१४, जयकर स्मृती, आरे रोड
गोरेगाव, (पश्चिम) मुंबई ६२

माझे पतीराज रा. वसंत वि. देसाई ता. ९–१–८२ रोजी मित्रांसमवेत श्री साईदर्शना पीत्यर्थ शिरडीला गेले. शनिवार होता. प्रवास वगैरे मजेत झाला. शिरडी मुक्कामीं पोचले. मंदीराच्या वरील गॅलरीत सर्वजण झोपले. सकाळी उठताच माझ्या मिस्टरांच्या ध्यानात आले की, किल्ल्या कुठेतरी हरवल्या. पॅटच्या चेननी बंदीस्त खिसा. मग किल्ल्या पडल्या कुठे? बऱ्याच महत्वाच्या किल्ल्या. सर्व मित्रांनी व मिस्टरांनी बिछाने वगैरे उलटे सुलटे केले. पण किल्ल्यांचा काहीं पत्ता नाही. आठ दहा जणांनी पॅंट उलटी सुलटी करून चाचपली पण व्यर्थ! स्नान वगैरे आटोपून सर्वजण साईदर्शनास गेले व म्हणाले, 'बाबा, एवढ्या लांबून तुमच्या दर्शनास आलो आणि तुम्ही फार नुकसान केलंत. आता कुलूपे बदलून परत किल्ल्यांचा सेट करायचा म्हणजे १००–२०० रुपयांना फोडणी.' आणि मनस्वास्थ बिघडलेल्या अवस्थेतच ते रविवारी रात्री घरी आले. मी म्हटले, बाबा काय म्हणाले? तर म्हणाले, 'बाबांनी आपले थोडे नुकसान केले. माझ्या किल्ल्या गेल्या. त्यावर मी म्हटले,' बाबांनी केलं तर कुणाच चांगलच करतात. कधीही कुणाचं नुकसान करीत नाहीत. एवढी मला पक्की खात्री आहे. आणि काय आश्चर्य! माझ्या कानामध्ये किल्ल्यांचा ओळखीचा आवाज येऊ लागला. मी म्हटलं किल्ल्या गेलेल्या नाहीत. मी मिस्टरांच्या पॅन्टला हात लावताच किल्ल्या माझ्या हातात. मिस्टर आश्चर्याने त्या किल्ल्यांकडे पहातच राहीले. नंतर आम्ही दोघानीही साईचरणी डोके ठेवले. बाबा तुमचा महीमा अगाध आहे.

# अशीही एक होळी पौर्णिमा

—श्री. विजय द. हजारे
गुंफादर्शन, बोरीवली



**पासष्ट वर्षापूर्वी ह्या तसबिरीच्या रुपात श्रीबाबा 'श्रीसाईसत् चरित्रकार हेमाडपंताच्या घरी अवतीर्ण झाले.**

एकोणीसशे सतरा सालातली होळी पौर्णिमा होती ती. आदल्या रात्री स्वप्नात येऊन बाबांनी हेमाडपंताना श्री. गोविंदराव दाभोळकरांना सांगितले होते की 'हेमाड्या हे बघ मी उद्या तुझ्याकडे जेवायला येतोय' बस्स । श्रीसाईबाबांनी नुसत 'येतो' म्हणून म्हटल्यामुळे गोविंदरावांना जो आनंद झाला की विचारू नका. त्यामुळे ते इतके भारावले की बाबांना कधी, केव्हा, येणार हे विचारण्याचेही त्यांना भान उरले नाही. त्या हर्षभरात ते झोपेतून जागे झाले. त्यांचे स्वप्न म्हणजे 'बाबांनी आपल्याला दृष्टांत दिला याची त्यांना खात्री पटली आणि....त्याप्रमाणे पुरणपोळीचे भोजनाची तयारी करून, सकाळीच 'हुताशनी'ची पूजाअर्चा करून ते बाबांची वाट पाहू लागले... घराच्या आजूबाजूच्या परीसरात कुणी फकीर दिसतो का म्हणून डोळे लावून वेध घेऊ लागले. पण रस्त्यावर चिटपाखरूही नव्हते सकाळची दुपार झाली. भोजनासाठी बोला-

विलेल्या नातेवाईकांच्या पोटात कावळे ओरडू लागले. 'बाबा किती वेळ ताटकळत ठेवणार आम्हांला, ह्या पाहुण्याना' अशी आर्तस्वरांत त्यांनी साईमाऊलीला हाक मारली. जेवणाची पंगत वाढायला लावली. बाबांसाठी पाट मांडला नैवद्याचं ताट ठेवलं गेलं...जो तो बाबांच्या आगमनाची वाट पाहू लागला. कंटाळून हळू हळू कुज-बुजू लागला पण बाबांच्या लाडक्या 'हेमाड्या'ची मात्र खात्री होती की बाबांनी शब्द दिलाय म्हणजे ते येणार म्हणजे येणारच भोजनाला...तरी देखील अन्न थंडगार होऊ नये म्हणून...'पुंडलीक वरदे हरी विठ्ठल' म्हणून जमलेली पंगत घास उचलणार तोच बाहेरच्या मुख्य दरवाजाची कडी वाजली. सारेजण थबकले हातातला घास हातात घेऊन आली माझी साईमाऊली आली' म्हणतच गोविंदराव बैठकीच्या खोलीत धावले. मोठ्या अधीरतेने त्यांनी दरवाजा उघडला. दारात दोन अनोळखी मुस्लीम गृहस्थ ! गोविंदरावांनी काही विचारण्याच्या आतच त्यांनी हातातील कागदा-मध्ये गुंडाळलेले एक तसबिरीचे पुडके त्यांच्या हातात दिले व म्हटले. 'हे तुमच्याकडे ठेवा...उगीचच वाटेल तेथे जाण्यापेक्षा वा फेकून देण्यापेक्षा तुमच्यासारख्या साई-भक्ताकडेच दिल्याने त्याची उपयुक्तता (मूल्यमापन) होईल असं वाटल्यामुळे आम्ही हे घेऊन तुमच्याकडे आलो आहोत....' आणि ते गृहस्थ तसेच निघून गेले. गोविंदरावांनी कागद उघडून पाहिला तर 'श्रीसाईंची' तसबीर...बोलकी जणू काही त्यांना सांगत होती की 'हेमाड्या बघ आलो की नाही रात्री सांगितल्याप्रमाणे. गोविंद-रावांच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. त्यांनी 'बाबा'साठी मांडलेल्या पाटा-वर ती तसबिर ठेवली. नैवद्य दाखविला...आणि श्रीसाईनामाच्या जयजयकारात भोजनाची सुरूवात केली......आज पासष्ट वर्षे झाली त्या गोष्टीला तसबिरीच्यारुपाने आलेले 'बाबा' आजही डॉ. गजाननराव दाभोलकरांच्या 'साईनिवासा'त आजही आपणास दिसतात. गोविंदरावांनी आपल्या 'श्रीसाई सतचरित्रात' एकेचाळीस ते त्रेचाळीसाव्या अध्यायात उल्लेख केलेला आपणास आढळून येतो......त्या दिवसा-पासून होळी पौर्णिमेच्या दिवशी डॉ. गजाननराव दाभोलकरांच्या बांद्राच्या निवासस्थानी 'तसबिररुपी श्री बाबांच्या' दर्शनासाठी साईभक्तांची सकाळपासून संध्याकाळपर्यंत मोठी रीघ लागते ती आजतागायत वाढत्या प्रमाणात हे नव्याने सांगायला नकोच.

# भाच्याने सांगितलेला एक किस्सा

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

—सौ. निर्मला चंद्रकांत मालवणकर
साई-स्मृती दादर

● बाबा आपणा सर्वांच्या पाठीशी अहोरात्र असतात ह्याचा प्रत्यय आपण सर्वांस आहेच. एखादी गोष्ट ( अर्थात चांगली ) घडून यावी असे आपणास मनोमन वाटताच कितीही अडचणी आल्या तरी ती आपल्या मनाप्रमाणे घडून येतेच.

परवा आम्ही पुण्याला गेलो होतो तेव्हा सहज आमच्या भाच्याला भेटण्यास गेलो. गप्पा मारता मारता बाबांच्या गोष्टी निघाल्या नि त्याने आम्हाला स्वतःला आलेला अनुभव सांगितला. म्हणाला—

एकदा काका ( त्याचे वडील ) आणि मी शिर्डीला गेलो. शिर्डीला गेल्यावर काकाचा परिपाठ ठरलेला असे. सकाळी आंघोळ वगैरे आटोपून अभिषेक करायचा व नंतर सत्यनारायणाची पूजा आटोपून दुपारची आरती झाल्यानंतर दोनाच्या गाडीने मुंबईला परतायचे. त्या दिवसात मुंबईला परतण्यास फक्त दोनचीच गाडी असायची. आम्ही कूपन वगैरे काढून अभिषेक केला. त्याचवेळी आम्हाला कळले की आज पुजारी कमी असल्याकारणाने सत्यनारायणाची पूजा दुपारच्या आरतीनंतर म्हणजे १–१॥ नंतर होईल. हे ऐकून आम्ही निराश झालो. मुंबईला परतण्यासाठी २ ची गाडी धरावयाची होती. आम्ही आपल्या खोलीवर गेलो. मला भूक लागल्याकारणाने मी दुकानावर जाऊन गाठे-जिलेबी खात बसलो. इतक्यात एक गृहस्थ तिकडे आले. 'तुम्ही पवार का ?' म्हणून त्यांनी मला विचारले. तुमची सत्यनारायणाची पूजा आहे ना ? तर लवकर चला ?

मी त्याला सांगितले आज पुजारी कमी असल्याकारणाने पूजा दुपारी आरती नंतर होणार आहेत. 'नाही वरून हुकूम आला आहे. तुमची पूजा आताच आहे.' मला आश्चर्य वाटले. मी तडक खोलीवर गेलो. काकांना सर्व काही सांगितले आणि विचारले. काका तुम्ही पूजे विषयी कोणाला काही सांगितले होते का ? ते नाही म्हणाले 'मी तर इकडे असाच बसलो आहे.'

आम्ही पूजेच्या खोलीत गेलो. तिकडे फक्त एकच आमच्या पूजेची तयारी केलेली होती. आम्ही यथासांग सत्यनारायणाची पूजा केली. प्रसाद घेतला आणि खोलीवर परतलो.

सांगा आहेत की नाही बाबा आपणा सर्वांच्या पाठीशी. कोणालाही आम्ही न सांगता त्यानी आमच्या पूजेची किती विलक्षण तऱ्हेने व्यवस्था केली. बोला—

'श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय.'

# आम्ही साईबाबांच्या पूजेला कां लागलो

—श्री. नंदकुमार राजाराम बेलवलकर
१९ टिळकनगर, एम. जी. रोड,
गोरेगाव मुंबई ४०००६२

● माझ्या आईने सांगितलेली हकीगत मी येथे निवेदन करीत आहे. १९३९ ते ४० च्या दरम्यान मी लहान असताना अतिशय आजारी होतो. अंधेरीतील त्या वेळी कमीत कमी ४।५ डॉक्टरांचे औषध करूनही माझी प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. मला आराम पडायचा तर राहो पण माझ्या आयुष्याचे (प्रकृतीचे) एक एक पाऊल मृत्यूच्या दाराकडे चालले होते. अशाच एके दिवशी माझी आई मला डॉक्टरकडे घेऊन जात असताना ( अंधेरी बाजाराजवळील म्युनिसिपल चाळीत रहाणाऱ्या ) एका बाईने आईला सल्ला दिला की मला घेऊन गोरेगाव पूर्वेला असलेले साईबाबांचे भक्त ( कै. नाईक महाराज हयात नाहीत हल्ली ह्यांचा आश्रम मालाड पश्चिम साईनाथ मार्गावर आहे. ) त्यांच्याकडे घेऊन जाण्यास सांगितले. ( माझे वडील अशिक्षित असूनसुद्धा त्यांचा डॉक्टरवर विश्वास होता. ) प्रथम वडिलांनी ह्या गोष्टीला फारच विरोध केला. पण आईने हट्टाने किंवा मी एक प्रयोग या दृष्टीने मला साईबाबांच्या भक्ताकडे घेऊन गेली. त्यांच्या मुखातून प्रत्यक्ष साईबाबा बोलावे तसे त्यांनी सांगितले की उदी ह्याच्या कपाळाला लाव. व चमच्याने थोडी पोटात जाऊं दे. तीन दिवसात ह्याला चांगलाच आराम पडेल. पण ह्यांची ओळख साईबाबांचा मुलगा करीत जा, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे खरोखरच मला ज्या डॉक्टरांचे ६।८ महिने औषध करूनसुद्धा काहीच आराम पडला नव्हता. त्या फक्त साईबाबांच्या उदीने ३ दिवसात ठणठणीत बरा झालो. आज तर साईबाबा म्हणजे कुलदैवत किंवा जीवन हे साईबाबामय झालेले आहे. ह्या आधुनिक विज्ञानयुगात विश्वास बसणार नाही असे साईबाबा आम्हाला आमच्या घराला कुटुंबाला ( एक आई आपल्या तान्ह्याला सांभाळते, लाड करते त्याप्रमाणे ) सांभाळतात. एक एक त्यांचे चमत्कार लिहू किंवा सांगू तरी शब्द अपुरे पडतील असे अनेक चमत्कार आमच्या जीवनात घडवीत आहेत.

# श्रीसाईसच्चरित्रातील काही 'निमित्त' स्थळे व त्यातून निघणारा बोध किंवा परिणाम

१) निमित्त – चांदभाईच्या पत्नीच्या भाच्याचा शिर्डीच्या वधूशी योग.
बोध – असंख्य भक्तांच्या उद्धारासाठी बाबांवरील निमित्ताने चांदभाईबरोबर शिर्डीला आले.

२) निमित्त – हेमाडपंतांच्या खाकी कोटाच्या वळ्यांतून टपाटप दाणे बाहेर पडले.
बोध – कोणतीही खाद्य वस्तू आपण कोणाला दिल्याशिवाय सेवन करू नये.

३) निमित्त – राधाकृष्णा आईच्या घरावरून शिडीवरून उतरल्याबरोबर बाबांनी आणणाऱ्या ग्रंथास २ रुपये दिले.
बोध – कोणाचेही परिश्रम फुकट घेऊ नयेत.

४) निमित्त – ठाण्याच्या चोळकरांचा साखर न खाण्याचा निर्धार व नवस फेडायला लागलेला विलंब.
बोध – आपण कोणताही विचार किंवा गोष्ट बाबांपासून लपवू शकत नाही.

५) निमित्त – राधाबाई देशमुखीण हिला बाबांपासून मंत्र हवा होता व त्यासाठी तिने बाबांसमोर उपोषण आरंभिले.
बोध – तिच्या निमित्ताने 'श्रद्धा–सबुरी' हे दोन महान मंत्र बाबांकडून सर्व भक्तांना मिळाले.

६) निमित्त – हेमाडपंतांनी बाबांना मशिदीत गहू दळताना पाहिले.
बोध – तो दळणाचा देखावा पाहून हेमाडपंतांना श्रीसाईसच्चरित हा प्रासादीक ग्रंथ लिहिण्याची प्रेरणा झाली.

७) निमित्त – मोहिद्दीनभाई व बाबा यांच्यात कुस्ती होऊन बाबा कुस्ती हरले.
परिणाम– त्या वेळेपासून बाबांनी अंगात कफनी व डोक्यास फडके असा पेहराव सुरू केला.

—श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुं. ७०

★

# श्रीसाईरामाचे प्रकट बोल

संकलन—सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन बंदररोड, रत्नागिरी

१) एक माझे नाव घ्या रे म्हणजे बेडा पार व्हाल.

२) जो माझे नाव घेईल, माझे गीत गाईल, माझ्याच गोष्टी सांगेल. त्याच्या मागे पुढे, चोहीकडे मी उभा राहीन ( म्हणजे त्याचे रक्षण करीन. )

३) तुम्ही माझ्याकडे अनन्य भावाने पहा मग मी तुमच्याकडे पाहीन.

४) तुम्ही का भिता ! मी तुमच्याजवळच आहे.

५) जे माझे भक्त आहेत, माझ्या चरणी जे अनन्यभावाने विनटले आहेत त्यांचा योगक्षेम चालवणे हे माझे कर्तव्यच आहे.

६) तुम्ही कुठेही असा, काहीही करा तुमच्या प्रत्येक कृतीची खबर मला इथे बसून दिसते, समजते.

७) तुमच्या आमच्या मधील ही तेल्याची भिंत पाडून टाका मग जाण्यायेण्याला मार्ग प्रशस्त होईल.

८) श्रद्धा ठेवा, सबुरी धरा म्हणजे तो श्रीहरी पावेल.

९) हे पाय फार पुरातन आहेत बरं !

१०) माझा भक्त जो दृढश्रद्धेने मजवर पूर्ण विश्वास ठेवून भक्ती करीत आहे त्याला कृतांताच्या दाढेतूनही मी ओढून काढीन.

११) जो माझ्या समाधीची पायरी चढेल त्याचे दुःख नाहीसे होईल.

१२) माझा देह नाश पावला असला तरी माझी हाडे तुर्बतीमधून सुद्धा तुमच्याशी बोलतील.

१३) तुमच्या अनेक जन्मांची मला ओळख आहे.

१४) जो अभिमान सोडून माझ्या ठायी निष्ठा ठेऊन कार्य करील त्याला मी सहाय्य करीन.

१५) माझ्या कथांचे दप्तर ठेवा, त्यांची आठवण ठेवा म्हणजे जिवाला समाधान, शांती लाभेल.

१६) जेथे भक्ती श्रद्धेने चालते त्याचा मी अंकीत असेन.

१७) गरिबांचा वाली अल्ला आहे.

१८) हरी प्रेमळांचा, भोळ्याभाळ्यांचा भुकेला आहे. दांभिकपणा त्याला आवडत नाही.

१९) माझ्या लीलांचे भक्तीभावाने लेखन, श्रवण केल्यास सर्व दोषांचे निरसन होईल.

२०) तुमची काळजी वाहाण्यासाठीच माझा अवतार आहे.

२१) 'साई-साई' हे नामस्मरण दुष्ट वासना नाहीशा करील अनन्यभावाने एक लोटांगण घातल्यास सर्व पापे नष्ट होतील.

२२) ज्यांनी धर्माचरण सोडले आहे, त्यांना बाजूस सारावे त्यांच्या छायेलाही उभे राहू नये.

२३) माया मोठी भयंकर चेटकी आहे. माझ्यासारख्या फकिराला सुद्धा ती त्रास देते. तेथे तुमचा काय पाड लागणार आहे ?

२४) आपले लागेबांधे असल्याशिवाय कोणी आपणाकडे येत नाही मग तो कुत्रा असो, माशी असो, डुक्कर असो त्यांना हडहड करू नका. आपल्या जवळ असेल ते त्यांना खायला घाला, नसेल तर स्वस्थ राहा.

२५) सर्वांच्या अंतर्यामी मी भरून राहिलो असून मी सर्वांचा स्वामी आहे.

२६) हे चराचर भरून मी राहिलो असून ईश्वरी सूत्राचा मी सूत्रधार आहे.

२७) मीच सर्व प्राणीमात्रांची माता असून कर्ता, धर्ता, संहती मीच आहे.

२८) जो माझ्याकडेच चित्त एकाग्र करील, त्याला कसले संकट पडणार नाही. पण ज्याला माझा विसर पडेल त्याचेकडे मी पहाणारही नाही.

२९) गुरुवारी आणि शुक्रवारी माझ्या गुरुच्या पादुकास्थानी जो ऊद जाळील त्याला श्रीहरी सुखी करील.

३०) भक्त भावार्थी असेल तर इथेही विठ्ठल मूर्ती प्रकट होईल. डाकुरनाथाची डंकपुरी, विठोबाची पंढरी तीच ही माझी शिरडी आहे.

३१) मानापमान सोडून देवद्वारी मान व्हावा, देवापुढेच पदर पसरावा व प्रसाद जोडावा.

३२) गरिबी अव्वल बादशाही असून श्रीमंतीपेक्षा लाखपटीने श्रेष्ठ आहे. श्रीमंती चिरंतन नाही, क्षणभंगूर आहे.

३३) आभाळ भरून आले आहे. पाऊस पडून जाईल व वातावरण निवळेल.

३४) तुमचे भोग तुमच्या भक्तीसाठी मला भोगावे लागतात.

३५) 'आई, माझे व्याकुळलेले प्राण तू जेवू घालून तृप्त केलेस. असेच करीत जा. तेच कामी येईल. या मशिदीत बसून मी कधीच असत्य भाषण करणार नाही.'

३६) मी तुमचा दासानुदास आहे. तुमच्या विष्ठेपोटीचा मी कीडा आहे. तुमच्यामुळे मी धन्य झालो आहे.

३७) माझा श्यामा खुळा असला तरी त्याचा मला लळा आहे.

३८) अरे, मी सर्व काही द्यायला तयार असताना मरण का मागतोस ? दहा जन्मांचा भोग दहा दिवसात भोगायला लावून मी तुझे रक्षण करीन.

३९) कुण्या कारट्याने माझी चिंधी चोरली ?

४०) नाना, ज्याला कांदा पचवायची हिंमत आहे त्यानेच तो खावा.

४१) अरे, रस्त्याने हजार चौकशा करता, भजन करता त्यापेक्षा प्रत्यक्ष इथे काय आहे ते पहा.

४२) जरा श्यामाकडे जाऊन बस. निवांतपणे गोष्टी बोल आणि श्यामाकडून माझी १६ रु. दक्षिणा घेऊन ये.

४३) लाख चतुराई सोडून साई साई म्हणा, त्यात हित आहे.

४४) काका, तुझ्या अंतकाळीची तुला काळजी आहे ना ? मी तुला विमान घाडून फुलासारखे नेईन.

४५) यांची ताटे सदाचीच भरलेली आहेत.

४६) खबरदार वर चढशील तर भटुरड्या !

४७) नाना, चंचल का होतोस ? ब्रह्मदेवाने जे निर्माण केले आहे त्याचे कौतुक केले पाहिजे. दृष्टी दृष्टीचे काम करू दे. मन स्थिर ठेव. पुढचे दार उघडे असता मागील दाराकडे का धावावे ?

४८) आई, शिमग्यासारख्या सणाला जेवायचे सोडून देहाला का कष्ट देतेस ? त्या दादाभटांच्या घरी जा, पुरणपोळ्या कर. त्यांना खाऊ घाल. तू यथेच्छ खा. सर्वांना तृप्त कर त्यानेच तू मला प्रिय होशील.

४९) आई, माझ्या गुरुनेच मला कोणताही मंत्र दिला नाही तो मी तुला कोठून देऊ ? उगाच देहाला का शिणवून उपाशी राहातेस ? श्रद्धा व सबुरी धर. हेच माझ्या गुरुने माझ्याकडून घेतलेले दोन पैसे.

५०) बिचारे मुके प्राणी ! त्यांना आपापल्या कळपातच राहू दे. तेथे त्यांना सुख लागेल.

५१) श्यामा, दक्षिणा मी मागत नाही. मशीदमाई आपले येणे मागत आहे.

५२) श्यामा, मी देव नाही. अल्लाचा बंदा गुलाम आहे.

५३) हा काकाचा मालक कुठला ? त्याचा मालक आणखी कुणी आहे ?

५४) तू खाऊ घातलेल्या भाकरीची ढेकर अजून मला येत आहे.

५५) अरे, तो मला यवन समजला नाही. उलट तो मला आपला बामण गुरु समजला म्हणूनच मी गंधाचा टिळा लावून घेतला.

५६) काका, बघतोस काय ? उचल तो सुरा आणि त्या बोकडाला मारून टाक.

५७) अरे, त्यात काय विशेष आहे ? पार्ल्याला काका दीक्षिताकडे जा. 'ईशावास्याचे कोडे,' त्याची मोलकरीण उलगडील.

५८) वीरभद्रा, चनबसप्पा, अजून तुमचे वैर संपले नाही? अरे बेडूक व सर्पाच्या नीच योनीत जन्मूनही तुम्ही अजून ताळ्यावर आलात नाहीत?

५९) अरे, तुझी घोडी त्या पलिकडच्या कुरणात चरत आहे बघ.

६०) हा म्हणतो मी लोकांची पोरे मारले, आता मी याच्या पोटी पोर आणतो. हा मशिदीत येऊन का रडतो?

६१) नोकरी सोड रे गणू! आपण कुणाचे बूट पुसू नयेत.

६२) असला कसला तू रामदासी! त्या भगव्या वस्त्राची काही लाज धर.

६३) एवढे आईवर प्रेम होते तर संन्यास कशाला घेतलास?

६४) आता तो काऊ येईल आणि चोंच मारून जाईल.

६५) नाना, जे काही गुणगुणत आहेस ते मोठ्याने म्हण मला ऐकू दे.

६६) मघाशी वाड्यात काय चालले होते? काय म्हणत होते हे हेमाडपंत?

६७) सर्वस्वाची राख रांगोळी होऊन तुझ्या खांद्यावर झोळी पाहीन तेव्हाच तुला सभाग्य मानीन.

६८) तुमच्या घरात मुसलमानी दैवताची पूजा होत नाही? 'काऽबीबी' आहे ना तुझ्या घरात?

६९) मामा, उठ. माझी पूजा आरती कर. बापूसाब येणार नाही मी मेलो असा त्याचा समज झालाय.

७०) गणू, या तेल्यातांबोळ्यांनी मला छळले म्हणून मी शिरडी सोडली मला बक्कळ फुलांनी सजव.

७१) श्यामा, ती आडकरांची आरती बापूगीरांकडे दे व उदी दे. बापूगीर तुला पैशांचीच काळजी ना अल्ला सारे बघेल.

७२) कां यावे जी!

७३) तुम्ही काहीही गुप्त ठेवायचे ठरवलेत तरी ते मला कळते.

७४) तो काय निजतो फळीवर? माझ्याशिवाय तिच्यावर कोणीही झोपू शकणार नाही.

७५) तुमचे हृदय हेच माझे घर आहे.

७६) मघाशी केलेला नमस्कार आणि आत्तांचा यात फरक आहे ना.

७७) तुमची आमची बहात्तर पिढ्यांची ओळख आहे.

७८) श्यामा, हे कोण चोरटे आणून माझ्या अंगावर घालतोस?

७९) कुठे पळाले ते वामन? बोलाव सगळयांना.

८०) माझे देऊळ बांधलेस आधी त्या शनीदेवाचे बांध.

८१) आपणच येथे येऊ. श्यामा आपणच इथे खेळू, बसू, बोलू.

# शुभकामनापर संदेश पाठविणारे साईभक्त

श्रीसाईबाबा संस्थानचे मुखपत्र असलेल्या श्रीसाईलीला या मासिकाने एप्रिल १९८२ रोजी ६० वर्षे पूर्ण करून ६१ व्या वर्षात पदार्पण केले यानिमित्य श्रीबाबांच्या या मासिकावर असंख्य भक्तांनी, वाचकांनी, लेखक-कवींनी, हितचिंतकांनी शुभकामनापर संदेशांचा अक्षरशः वर्षाव केला. ६१ व्या वर्षाच्या पहिल्या अंकात काही मान्यवर व्यक्तींचे शुभसंदेश आम्ही प्रकाशित केले होते. आलेले सर्वच संदेश श्रीसाईलीलामधून प्रकाशित करणे केवळ अशक्य आहे. म्हणून संदेश पाठविणाऱ्या सर्व मान्यवरांची नावे येथे प्रसिद्ध करीत असून त्यांनी पाठविलेल्या किंवा व्यक्त केलेल्या शुभ कामनांबद्दल श्री साईबाबांचे वतीने, आभार प्रदर्शित करीत आहोत—

—का. संपादक

## श्रीसाईलीलाच्या पहिल्या संपादकांच्या कन्येचा शुभसंदेश !

माझे वडील लक्ष्मण गणेश महाजनी (काका महाजनी) हे श्री साईलीला मासिकाचे प्रथम संपादक होते. श्रींचे गुणवर्णन व त्यांच्या नाना प्रकारच्या लीला भक्त मंडळींना कळाव्यात व साईभक्तीचा प्रचार व्हावा ह्याच खास उद्देशाने त्यांनी त्या काळच्या सर्व भक्त मंडळींच्या सहकार्याने हे मासिक सुरू केले.

तेव्हापासून श्रीसाईलीला अखंडित चालू आहे व भक्तीचा मळा पिकून त्याला अमाप पीक येत आहे ही सर्व श्री बाबांचीच कृपा आहे.

ह्या अध्यात्मिक, मराठी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मासिकास श्री साईभक्तीची व अनुभवाची जोड मिळत आहे त्यामुळे श्रद्धाळू लोकांची भक्ती द्विगुणित होत आहे व साई चमत्कार वाचून नवीन नवीन भक्त अनुभवाने निर्माण होत आहेत अशी शक्ती ह्या मासिकात आहे.

श्री साईलीला हे मासिक उत्तरोत्तर भरभराटीत राहो व भक्त मंडळींना श्री साई नाथांचा कृपाप्रसाद मासिकाच्या रूपाने जगभर प्राप्त होवो, 'श्री साईलीला दीर्घायू होवो' हीच शुभ-कामना श्री सद्गुरू चरणी प्रार्थिते.

त्याचबरोबर ही लीला घरोघर पोहोचविण्याचे कार्य करण्याकरिता श्री संपादक द्वयांनाही श्री साई महाराज दीर्घायू करोत हीच सदिच्छा.

—सौ. प्रभाताई मुळये, इंदूर

श्रीसाईलीला मासिकाला साठ वर्षे पूर्ण होत आहेत हे कळल्याने आनंद वाटला हे मासिक आणखीन भरभराटीला येवो व श्रीसाईबाबांची आणि भक्तांची दीर्घकाल सेवा करो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

—यशवंतराव चव्हाण

## संदेश पाठविणाऱ्या मान्यवरांची नावे

१. श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे, इचलकरंजीकर, कोल्हापूर
२. लीलाताई गोलतकर, परळ, मुंबई
३. ले. कर्नल श्री. मु. ब. निंबाळकर, पुणे
४. कु. संजीवनी पुरुषोत्तम गायधनी, जळगाव
५. श्री. पुरुषोत्तम गोपाळ गायधनी, जळगाव
६. श्री. जगन्नाथ नारायण कुलकर्णी, छायाचित्रकार, पुणे
७. श्री. विजय रसाळ, श्रीरामपुर
८. श्री. आनंद सातार्डेकर, वास्को-द-गामा, गोवा
९. श्री. रा. अ. बारई, काटोल
१०. श्री. जयप्रकाश बाबरेकर, डहाणू
११. श्री. ग. दे. कुलकर्णी, उस्मानाबाद
१२. श्री. शंकरलाल शहारे, भंडारा
१३. श्री. व सौ. सी. एच. ढापरे, मोठीदमण
१४. सौ. प्रमोदिनी मो. देशमुख, तळाशेत
१५. सौ. लीला फडके, कानपूर
१६. सौ. सुनिता जोशी, डोंबिवली
१७. श्री. अनिल रिसबूड, गिरगाव
१८. सौ. शांताबाई ब. सरोदे, दादर
१९. श्री. दामोदर पाटील, बोरीवली
२०. सौ. सिंधु कृष्णराव सणस, काटोल
२१. सौ. मालती केळकर, उज्जैन
२२. श्री. विष्णूपंत तानावडे, सिद्धेश्वर कुरोली
२३. श्री. रमेश बाबरे, डहाणू
२४. सौ. व श्री. रमेश चव्हाण, नवापूर
२५. श्री. चंद्रकांत भवर, महिदपूर

२६. श्री. सत्यवान श्रीधर बाणे, मुंबई ३७
२७. श्री. गोपात पांडुरंग मळीक ,, ,,
२८. श्री. अनिल भिकाजी सावंत ,, ,,
२९. श्री. सावळराम श्रीधर गावडे ,, ,,
३०. श्री. यशवंत वसंत तारी ,, ,,
३१. श्री. नंदकिशोर करंजेकर मुंबई १४
३२. श्री. दा. ग. आंगणे, दहिसर
३३. श्री. जगन्नाथ पंढरीनाथ मोहिले
३४. कु. राधिका डोंगरे
३५. श्री. विजय आर अमिनभावी, अमदाबाद
३६. श्री. म. स. मोदी, ठाकुरद्वार
३७. श्री. विठ्ठल कृष्ण माळगी, बेळगाव
३८. सौ. देवकी सकपाळ, दादर
३९. श्री. विजयकुमार गुप्ते, बोरीवली
४०. श्री. प्रवीण वैकुडे, वसई
४१. सौ. सुनिता चावक, डोंबिवली
४२. एच. आर. जग्गी, राहुरी
४३. श्री. नीलम शाम देसाई, गोरेगाव
४४. श्री. प्रकाश कर्पे, इंदूर
४५. श्री. बाळासाहेब नाडकर्णी, कोल्हापूर
४६. श्री. नागेश मोगलाईकर, धुळे
४७. डॉ. एन. एम. गंधे, दाभाड, ता. भिवंडी
४८. सौ. शुभदा सदानंद चुरी, माहिम
४९. श्री. जे. एस. चौरासे, भिलाईनगर
५०. श्री. मनुभाई शहा, नवापूर
५१. श्री. एल. व्ही. भोंगे, नंदुरबार
५२. श्री. शशिकांत नाईक, खार, मुंबई
५३. श्री. सुनीलभाई आजगावकर, दहिसर
५४. श्रीं. टी. जी. जाधव, अंबरनाथ
५५. सौ. शशिकला रेवणकर, अंबरनाथ
५६. श्री. गोविंद महादेव हुले, मुंबई १३
५७. सौ. कि. के. कर्णिक, अंधेरी

५८. श्री. चिंतामण उर्फ नाना शिंत्रे, चेंबुर
५९. सौ. उषाताई अधिकारी, रत्नागिरी
६०. श्री. वामनराव, इंदूर
६१. श्री. विजय सोनटक्के, पनवेल
६२. सौ. व श्री. बलभीम देशपांडे, पुणे
६३. सौ. निर्मला राजे, चिंचबंदर, मुंबई
६४. श्री. संगीत व्ही. मथुरे, कोल्हापूर
६५. सौ. व श्री. प्रल्हाद खैरे, पुणे ९
६६. श्री. अनिल जगदाळे, पुणे
६७. श्री. विश्वनाथ शिंदे, रत्नागिरी
६८. श्री. रमेश आबादे, संतनगर, पुणे ९
६९. सौ. व श्री. गोपाळराव जगदाळे, पुणे ११
७०. श्री. एस. डी. सोनवडेकर, वडाळा, मुंबई
७१. सौ. शा. शां. दळवी, मुलुंड
७२. श्री. बी. सी. जाधव, वालचंदनगर
७३. कु. सरल खारकर, शिव, मुंबई
७४. सौ. प्राची शहाणे, डोंबिवली
७५. श्री. बापूसाहेब निरखे, इंदूर

# मुस्लीम बंधु पुरुष नसबंदी शिबीर....

श्री साईबाबा संस्थान शिरडी, जिल्हा परिषद, अ. नगर व मुस्लीम समाज यांचे सहकार्याने दि. ३१–३–८२ रोजी श्री साईनाथ रुग्णालय शिरडी येथे मुस्लीम पुरुष नसबंदी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

शिबीरात २८ रुग्णांवर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

सरकारतर्फे प्रत्येक रुग्णास रु. २०० व श्री साईबाबा संस्थान शिरडी तर्फे रु. २०१ अनुदान म्हणून देण्यात आले. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णाना श्री साईबाबा संस्थानचे वतीने मोफत जेवण देण्यात आले.

या शिबीरात श्री साईनाथ रुग्णालयाचे डॉ. प्रबोध जोशी, डॉ. प्रभाकर देशपांडे, डॉ. ठोळे आणि जिल्हा परिषदेतर्फे डॉ. क्षीरसागर, डॉ. पाटील, डॉ. गुंजाळ यांनीं भाग घेतला. शिबीराचे संचालन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ताहेरभाई मेहमूद यांनी केले.

# श्रीसाईलीलाची षष्ठयब्दीपूर्ती

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे मुखपत्र असलेल्या श्रीसाईलीला मासिकाला यंदा १ एप्रिल १९८२ रोजी साठ वर्षे पूर्ण झाली म्हणून एक छोटासा औपचारीक समारंभ शिरडी येथे श्रीरामनवमी उत्सवाच्या पहिल्याच दिवशी १–४–८२ रोजी सायंकाळी ४ वा. श्रीसमाधीमंदिरासमोरील प्रांगणात करण्यात आला.

श्रीसाईलीला मासिकाच्या ६१ व्या वर्षाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन श्रीदासगणू महाराजांचे मानसपुत्र श्री. अनंतरावजी आठवले पुणे यांचे शुभहस्ते व्हावयाचे होते परंतु काही मौलिक लेखन कार्यात ते हिमालयात गुंतलेले असल्याने येऊ शकले नाहीत. त्यामुळे या प्रथमांकाचे प्रकाशन श्री दासगणू महाराजांचे ज्येष्ठ व वयोवृद्ध शिष्य ह. भ. प. श्री तुकाराम बुवा आजेगावकर वय वर्षे ८० रहाणार हिंगोली जि. परभणी यांचे शुभहस्ते करण्यात आले.

सुरुवातीला या समारंभाचे प्रास्ताविक निवेदन का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी केले. आपल्या निवेदनात त्यांनी समारंभाचे प्रयोजन सांगून श्रीसाईलीलाच्या ६० वर्षांचा इतिहास थोडक्यात मोजक्या शब्दात सांगितला. अंकाच्या एकसष्टीच्या पहिल्या अंकासाठी आलेले शुभचिंतनपर संदेश संस्थानचे ऑफिस सुपरिंटेंडेंट श्री. द. चिं. पाठक साहेब यांनी वाचून दाखविले. माजी राज्यपाल श्री. ओ. पी. मेहरा साहेब, श्री. शंकरराव चव्हाण, श्री अवधूतानंद महाराज, श्री मुक्तानंद बाबा इ. चे संदेश प्रमुख होते.

यानंतर डॉ. अ. का. पाठक यांनी श्री तुकारामबुवांचा परिचय करून दिला.

यानंतर कोर्टरिसिव्हर श्री. काकरे साहेब यांचे भाषण झाले. आपल्या भाषणात त्यांनी श्रीसाईलीला मासिकाचे साहित्यिक गुण श्रेष्ठ दर्जाचे करण्याची इच्छा प्रदर्शित करून तसे आवाहनही त्यांनी लेखक मंडळींना केले.

यानंतर अंकाचे प्रकाशन श्री तुकारामबुवा आजेगावकर यांचे शुभहस्ते झाले. या मासिकाचा पहिल्या वर्षाचा पहिला अंक प्रकाशित झाला तेव्हा मी होतो व त्या अंकाच्या तयारीची गडबड–धावपळ मी पाहिलेली आहे व आज एकसष्ठाव्या वर्षाच्या पहिल्या अंकाचेही प्रकाशन मी पहात आहे व ते माझ्या हातून होत आहे याबद्दल मला धन्यता वाटते असे सांगून त्यांनी मासिकाला शुभेच्छा व्यक्त केल्या.

शेवटी सुपरिंटेंडेंट श्री. पाठकसाहेब यांनी सर्वांचे आभार मानले व अवघ्या वीस मिनिटात हा समारंभ आटोपता घेण्यात आला.

॥ साई समर्थ ॥



श्री गोदावरी माताजींच्या पूर्ण आशीर्वादानी प्रकाशित होत आहे.

# 'श्रीसाई गीतांजली' भाग १

(मराठी–हिन्दी–इंग्लीश)

श्री साई गीतांजली हा उत्कृष्ट काव्य ग्रंथ आहे.

**–डॉ. ग. गो. दाभोलकर**

उपक्रम स्तुत्य, श्रीबाबांचे आशिर्वाद!

**–श्री. काकरे**, संपादक–श्रीसाईलीला

मराठी–हिन्दी कविता भावपूर्ण, प्रभावी! इंग्रजी सारांश वैशिष्ठ्य!

**–श्री. दि. परचुरे**, संपादक इंग्लीश साईलीला

भक्ती रसपूर्ण, चिंतनशील काव्य!

**–श्री. सदानंद चेंदवणकर**, संपादक श्रीसाईलीला मराठी.

हा काव्यसंग्रह साईभक्तांना निश्चितच आनंद देतो.

**–सुधाकर सामंत**, (भक्तीसंगम)

श्रीबाबांच्या भक्तीने आशिर्वादाने फुललेले काव्य!

**–श्री. दत्ताराम बारस्कर** (नवाकाळ)

साईबंधु **प्रभाकर कोळमकर**–साईमय–साईकवि झाल्याची पावती म्हणजेच श्री साईगीतांजली।

**–श्री. विजय हजारे**, (साईगीत दरबारवाले)

**सवलत! फक्त १५ ऑगस्ट १९८२ पर्यंत!**

**८० रु. ची १० पुस्तके फक्त ६० रु. त.**

म. ऑ. पत्ता–**प्रतिभा प्रकाशन**, १९–क, गुंफादर्शन,
बोरीवली (पूर्व) मुं. नं. ६६ [टपाल खर्च वेगळा]

# भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे

( मागील अंकावरून क्रमशः )

[ असंख्य साईभक्तांनी केलेल्या मागणीमुळे मोठ्या कष्टाने व परिश्रमाने संग्रहीत केलेली ही सूची या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. आमच्या असंख्य भक्तांना ही सूची नक्कीच संग्राह्य वाटेल. का. सं. ]

१३) श्रीसाईबाबा मंदिर — हाजी महंमद कासम बिल्डिंग, फॉर्जेट स्ट्रीट, गोवालीया टँक जवळ ताडदेव, मुंबई

१४) श्रीसाई मंदिर [ कै. दाजी कृष्णराव दळवी ] — कॉंग्रेस हाऊस समोर, लाकडाच्या वखारी शेजारी, व्ही. पी. रोड, गिरगाव मुं. ४

१५) श्रीसाईबाबा मंदिर — जवाहरनगर, साईबाबा मार्ग, खार ( पूर्व ) मुंबई

१६) श्रीसाईनाथ मंदिर — एलफिन्स्टन मार्केट, परळ, मुंबई ४०००१२

१७) श्रीसद्गुरु साईनाथ कृपामठ [ श्री. शामराव लोंबर ] — स्वारगेट, पुणे-सातारा रोड पुणे—९

१८) श्रीसाईदास मंडळ [ श्री. नानासाहेब रासने ] — शिवाजी नगर, पुणे

१९) श्रीसाईबाबा मंदिर [ श्री. वालावलकर ] — कानसई, मु. पो. अंबरनाथ ( पूर्व ) जि. ठाणे

२०) श्रीसाईबाबा मंदिर — उल्हासनगर, ( जि. ठाणे )

२१) श्रीसाईबाबा मंदिर — मु. पो. चिंचणी, जि. ठाणे ( पश्चिम रेल्वे )

२२) श्रीसाईबाबा मंदिर — नरपड, मु. पो. डहाणू ( पश्चिम रेल्वे )

२३) श्रीसाईबाबा मंदिर — ठळकवाडी, रेल्वे लाईन समोर, मु. पो. बेळगाव

२४) श्रीसाई स्पिरीचुअल सेंटर — त्यागराज नगर श्रीसाईबाबा मंदिर रोड मु. पो. बंगलोर

२५) श्रीसाईबाबा मंदिर — महात्मा फुले रोड, विष्णूनगर डोंबिवली ( पश्चिम )

—क्रमशः चालू

# त्रिकालज्ञ श्रीबाबा

— श्री. बाळकृष्ण अ. देसाई
१५१, गोखलेरोड, भांगरवाडी,
लोणावळा ४१०४०१

**माझा जो जाहला काया-वाचा-मनी ।**
**तयाचा मी ऋणी सर्व काळ ॥ श्रीसाई**

## १) विठ्ठलभक्त श्रीगोंदेकर :

अविंध यातीस निपजलो । कुराण पुराण बोलो लागलो । वळी साधु सिद्धांत मानलों । स्वहित परहिता गुणे ॥ ६६ ॥ ज्याला नवा जिता ईश्वर । त्याचा शोधू नये कुळाचार । पहा दुर्गंधा केली सुंदर । व्यास निपजले तिथे ॥ ६७ ॥ हनुमंत पाहा यातीचा वानर । त्यास गुज बोले तो रामराया । संपल्या देहाचा अवतार । द्वापारी मेट दिधली ॥ ६९ ॥

वरील ओव्या 'योग संग्राम' ह्या काव्य संग्रहातील आहेत, नि तो लिहिला आहे शेख महंमद बाबा श्रीगोंदेकर यांनी.

शेख महंमदबाबा मुस्लीम धर्मीय. हिंदु देव-देवतांना मानणारे नि जयराम स्वामींचे सहकारी. त्यांच्या गाठीभेटी वारंवार होत. एकदा जयराम स्वामींनी शेख बाबांना वाघाच्या रूपात दर्शन दिले. महंमद बाबा बावरले. हे पाहून स्वामींनी त्यांना आपले जानवे दाखविले.

शेख महंमदांचा जन्म मरांठवाड्यात धसर येथे १५६५ त झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राजे महंमद नि आईचे पुन्हलेशा-शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी राजे भोसले यांनी श्रीगोंदे येथे मकरपेठ वसविली, नि महंमद बाबांना तिथे आणून ठेवले. शेख बाबांना श्रीगोंद्यास तीन वेळा सर्पदंश झाला, पण चांद माणकोजी बोधले यांच्या कृपेने विषबाधा झाली नाही.

शेख महंमदांचा 'योग संग्राम' ग्रंथ प्रसिद्ध आहे. शेख अविंध असून ते मराठीत ग्रंथरचना करतात, कथा कीर्तनात लोकांना गुंगवून सोडतात, हा भ्रष्टाचार आहे असे समजून काशीतील ब्रह्मवृंदांनी पाहायला म्हणून तो मागून नेला, नि न उलगडता आणला तो तसाच गंगेत नेऊन बुडविला. शेख बाबांना हे समजले तेव्हा त्याना मरणप्राय दुःख झाले.

एकदा श्रीगोंद्यास शेखबाबा कीर्तन करीत होते. मंडप गर्दीने चिक्कार भरून गेला होता. कीर्तनाला तसा चांगला रंगही चढला होता. जमलेले लोक देहभान विसरून कीर्तनात एकरूप झाले होते. कथेचे निरूपण चालू असता, त्यांनी एकदम उडी मारून मंडपाची पाटणी चोळली. लोकांना मोठ्ठच आश्चर्य वाटलं. बाबांनी एका-एकी असं का केलं? कीर्तनही थोडावेळ थांबलं. 'असं का?' असं प्रत्येकजण एक-मेकांना विचारू लागला.

श्रोत्यांची स्थिति बाबांना कळून चुकली. त्यांनी खुलासा केला. 'तिकडे देहूत तुकाराम बुवांचे कीर्तन चालू असता मंडप पेटला. कुणालाच त्याचे भान नव्हते. जो तो कीर्तनात चूर. भक्ताप्रमाणे देवही कीर्तनाला येऊन बसले होते. मात्र हे कुणालाच कळलं नव्हतं. प्रत्यक्ष पांडुरंग तुकाराम बुवांच्या मागे उभे राहून चिपळ्या वाजवीत होते. आगीकडे कुणाचेच लक्ष नव्हते. भान हरपून टाकणारे तुकाराम कीर्तनात बेहोष झाले होते. हे सारं मला कळलं. एकाएकी दृष्टांत झाला. म्हणून उडी मारून मी पाटणी चोळली, अन् तिकडे आग विझली.'

महंमद बाबांच्या ह्या खुलाशाने जमलेला समुदाय आश्चर्यचकीत तर झालाच, पण त्यांच्या त्रिकाल ज्ञानाचा त्यांना प्रत्यय आला.

काशीला 'योग संग्राम' नेऊन सहा महिने लोटले, तरी ब्रह्मवृंदानी तो परत केला नाही, म्हणून बाबांनी त्यांच्यापाशी तो मागितला. पण ब्रह्मवृंद तो देतात कुठला? त्यांनी तो न उघडता, न वाचता सहा महिन्यापूर्वीच गंगार्पण केला होता.

शेखबाबा दुःखी झाले. उठले ते मजल दरमजल करीत गंगातीरी पोहोचले, नि गंगामाईची प्रार्थना करून म्हटले, 'गंगामाई, तू आई ना! लेकराचा अमोल ठेवा तुझ्या उदरी आहे, तो त्याला नाही का परत करायचा! बालकाचे अधिक उणे बोल आई पोटात घालून त्याला नाही का कुरवाळत? माझ्या बोबड्या बोलांचे लोकांनी कौतुक करावं असं नाही का तुला वाटत? आई असं कधीच करीत नसते. ती रागा-वते, पण पोटात माया ठेवून! माझा 'योग संग्राम' मला परत मिळावा ही इच्छा तू

पूर्ण नाही का करणार ? ' असं म्हणून शेखबाबांनी क्षणभर डोळे मिटून गंगामाईचे ध्यान केले, डोळे उघडून पाहातात तो ग्रंथ जशाचा तसा बांधलेल्या स्थितीत कोरडा वर येऊन तरंगत असलेला ! बाबांनी तो उचलून मस्तकी धारण केला. इंद्रायणीत बुडविलेल्या तुकारामाच्या ' गाथे 'प्रमाणे चमत्कार घडला.

श्रीगोंदे येथे शेख बाबांचा फाल्गुन शुद्ध नवमीला उत्सव होत असतो. ' योग संग्रामात ' महंमद बाबांनी सद्‌गुरुचे वर्णन पुढील शद्बात केले आहे. जैसे मेदिनीचे धैर्य थोर । उत्पत्ति, प्रळय होय अनाचार । परी कोणालाच न दे प्रतिउत्तर । तदन्याये असे सद्‌गुरु ।। २० ।। जैसे बावनकशी सुवर्णालागी । तोडून मूसेस घालिजे अग्नी । परी ते न सांडीच काही धर्मा । स्वये तेजाकाराची ।। २१ ।। निर्विकारपणे तो सद्‌गुरू हृदयी निर्मळ दर्पणाकारू । अष्टही अंगे जैसी साखरू । गोडाळपणे असे ।। २२ ।। असो अंधार अथवा उजेड । परी साखर खाता लागे गोड । पवित्र अशुच दृढमूढ । तैसा सद्‌गुरू समान ।। २३ ।। इक्षुदंडासी भक्षिती राजकुमर । अथवा चोरून नेती तस्कर । काही न सांडीगोडीचे घर । तदन्याये सद्‌गुरू ।। २४ ।। शशिभानु गंगाजळी बिंबला । अथवा थिल्लरी कुंडी देखिला । तो जरी चराचरी व्यापिला । परि अलिप्त असे ।। २७ ।। ऐसा जो द्वैत अहंकारे जड जाला । तो जाणा ईश्वरी नाही मिळाला । सद्‌गुरू कृपेविण अधोगतीस गेला । वेषधारी होऊनिया ॥ ३३ ।। मन आले ज्याच्या हाता । त्यासी आमचे काही न तत्वता । सद्‌गुरू पदी बैसला तो ।। २०३ ।।

हरी व अल्ला एकच. शेखबाबा म्हणतात—' आता अल्ला म्हणा वो तुम्ही वाचे । हरी म्हणता तुमचे काय वेचे । हरी अल्ला न म्हणतील ते काचे । अघोरी जाणारे ।। ऐका हरी अल्ला जरी दोन असते । तरी ते भांडकांडोच मरते । वोळख काही ठाव उरो न देते । येरून येराचा पै ।। पहा पहा दोन्ही राजांचे लक्षण । द्वैत नष्टपणे लागले भांडण । तैसे अविनाश परब्रह्म संपूर्ण । आद्य अद्वैतपणे ॥

सद्‌गुरू आणि हरी-अल्ला एकच. ह्या सर्व विवेचनावरून महंमदबाबांचे विवरण किती सखोल नि समर्पक होते याची वाचकांना कल्पना न आली तरच नवल ।

ऐसे असती संत । जे जगाचे झेलती आघात । परी साधिती देशबंधु हित । रात्रंदिन एकचि ध्यास ॥

### २) आग विझवतोय !

पारशी लोक आपल्या अग्यारीत ( देवळात ) अहोरात्र अग्नि पेटत ठेवतात. झरतुष्ट्र हा पारशी धर्मसंस्थापक आणि अग्नि हा त्यांचा देव. ते सूर्योपासक आहेत

मुंबईत सायंकाळी पारशी स्त्री-पुरुष चौपाटी, मरीनलाईन्स वगैरे ठिकाणी मावळत्या सूर्याला हात जोडून नमस्कार करताना नि त्याचा निरोप घेताना दृष्टीला पडतात. अग्नीत ते सारखे चन्दन जाळतात.

साईबाबा आपल्या धुनीत लाकडे जाळीत. ही लाकडे पुरविण्याचे काम त्यांचा भक्त आप्पा भिल्ल न चुकता करीत असे. लाकडे विकून उदरनिर्वाह चालविणे हा त्याचा व्यवसाय. दोन मोळ्या विकल्या की बाबांना एक आणून द्यायची हा त्याचा क्रम न चुकता चालू असे.

असेच एकदा ते आपल्या धुनीजवळ बसले असता, एकाएकी उठून धुनीतील आग विझवल्यासारखे करू लागले. समोवती असलेल्या भक्तमंडळींना बाबांच्या ह्या वागण्याचे आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले, 'बाबा, हे काय करता आहात तुम्ही?'

'आग विझवतोय ताजुद्दीनच्या दर्ग्याची!' बाबांनी उत्तर दिले.

आणि दोन दिवसांनी ताजुद्दीनचे पत्र आले. त्यात 'दर्ग्याला एकाएकी आग लागली. सर्व माणसे भेदरून गेली. काय करावं हे कुणालाच सुचेना. कारण जवळपास पाण्याचा ठिकाणाच नव्हता. पण आश्चर्य हे की, आग जशी लागली तशी ती आपो-आप लगेच विझली!'

पत्रातील ह्या मजकुराने बाबांच्या अंतर्ज्ञानाची लोकांना साक्ष पटली. ताजुद्दीन हा अनेक भक्तांप्रमाणे बाबांचा एकनिष्ठ भक्त होता.

## ३) जळणारी मुलगी वाचविली

असाच आणखी एक प्रकार. एके दिवशी धुनी धगधगत असता बाबांनी त्या आगीत हात घालून काही ढवळल्यासारखे केले. भक्त मंडळींना ह्याही वेळी आश्चर्य वाटलं. तेव्हा बाबा त्यांच्याकडे वळून म्हणाले, 'तो आपला नेहमीचा लोहार भट्टी पेटवून लोखंडाच्या सळ्या तापवीत होता. एवढ्यात त्याची धाकटी मुलगी धावत, खेळत, नाचत तिथे आली, नि झोक जाऊन भट्टीत पडली. तिला मी बाहेर काढले!'

इकडे लोहार घाबरला, नि त्याने बाबांचा धावा केला; अन् चिमूटभर उदी पेटत्या भट्टीत टाकली, आणि मुलीला हात देऊन बाहेर काढली. अगदी कसलीच दुखापत न होता. 'ही आहे बाबांची दिव्य करणी नि भक्तावरील अलोट कृपा.'

लोहार त्यावेळी म्हणाला देखील. 'असे आहेत माझे बाबा त्रिकाल ज्ञानी, त्रिकाल स्पर्शी!'

卐

# पूर्ण विचारांनी साईनाथच श्रेष्ठ

—सौ. सुनिता त्रिंबक चावक
अशोक भुवन, नवापाडा डोंबिवली

● माणसाला दुःख, आजार, मानसिक चिंता, ह्या पासून मुक्ति हवी असते. तसेच सुख, निरोगीपण, व मनशांती ह्या गोष्टी हव्या असतात. हव्याशा वाटणाऱ्या गोष्टी जर प्रयत्न करूनही मिळाल्या नाहीत तर तो त्या मिळविण्यासाठी 'अध्यात्मिकते'कडे वळतो. ह्याच वळणावर तो संत, ईश्वर ह्या गोष्टींच्या मागे लागतो. संताची शिकवण त्याच्या मनाला शांततेचा दिलासा देते.

मानव अशा संताच्या किंवा, ईश्वराच्या शोधात असतो, की, जो त्वरीत त्याला वरील गोष्टी पुरवेल.

आपणास आलेला संताचा अनुभव जर आपण त्यास अशा वेळेस सांगितला तर त्यास लगेच पटतो, व आपण वर्णिलेल्या संताच्या मागे लागतो. संताच्या भक्तिला श्रद्धा, सबुरी, ह्या गोष्टी तो ध्यानात न घेता त्याला हव्या असणाऱ्या गोष्टीच तो मागत सुटतो. हव्या असणाऱ्या गोष्टी त्याला तर मिळत नाहीतच, पण संताची आठवण सुद्धा त्याला रहात नाही.

अधिरतेने ईश्वराकडे पहाणे आणि अधिरतेनेच नरठरवाद मान्य करणे, ह्या मानवाच्या मनाच्या दोन टोकातील फरकामुळेच मानव संभ्रमीत होतो.

आता आजारबद्दल पाहू? माणसाला आजारपण का येते? त्या आजाराला मुख्यत्वे त्याचे शरीरच कारणीभूत असते. मानवाच्या शरीरावर मनाचा ताबा असतो. आणि मानवी मन हे बहुतेक मलीन विचार, मलीनता, वासना इतपर्यंतच घोटाळत माणसाच्या इंद्रियावर मन ताबा दाखवते व इंद्रिये मनासारखी वागू लागतात. ह्यातून आजार पणाला आधार प्राप्त होतो.

आजारपणासाठी औषधापचार करणे हे केव्हाही चांगले. अशा वेळेस श्रद्धेपोटी आपण आपल्या ईश्वरावर विश्वास जरूर धरावा, पण त्या परमेश्वरास श्रद्धेपोटी वेठीस बांधू नये. कारण त्याला तुमच्यापेक्षा इतर फारच मोठी कामगिरी पार पाडावयाची असते. शिवाय आपली त्याच्यासाठी श्रद्धा फार मोठी नसते, त्यामुळे आपल्या विचारातीं आपण निर्णय घ्यावा.

अशा वेळेस 'संतावरील श्रद्धा' ही आपल्या मनाची एक स्थिती असते, व आलेले 'शारिरीक आजारपण' ही 'वास्तविकता' असते. शरीराला औषध डॉक्टरांकडून घ्यावे, व श्रद्धेतून आपला संत पहावा. हेच योग्य, दोन्ही एकत्र आणून, अगर दोघांची गफलत करून तो 'अनुभव' ह्या सदराखाली दुसऱ्याला सांगू नये. कारण ह्यामधूनही 'नश्वरवाद' पसरतो.

मानसिक चिंतेपासून मुक्ति अध्यात्मिकतेतून 'सुसंस्कृत' मनास नक्कीच मिळते. तसेच मनाच्या आजारपणास संत हवेत, व आजारपण ठराविक संत बरा करील असा त्याचबरोबर विश्वासही हवा.

'मानसिक चिंता' जोपर्यंत मानव ह्या स्वरूपात आपण आहोत तोपर्यंत राहणारच कारण मन + मानव युती परमेश्वर मान्य आहे.

मनाची तळमळ काही अंशी शांत करण्यास संत हवेत. आपले मन अशा वेळेस स्वच्छ असावं, दुसऱ्याचे दुःख, आजारपण, हे आपले समजण्याइतपत ते स्वच्छ ठेवावं पण हे अशक्यच आहे कारण आपलेपणा, भावना, हेवेदावे हे येणारच आणि म्हणूनच संतासाठी किती अशक्य गोष्टी आपणास दूर कराव्या लागतात हे दिसते.

'श्रीसंत साईनाथ' ही अद्भुत शक्ति आहे. अतिसूक्ष्म मनलहरी ह्या संताला समजतात, व भक्तास त्वरीत अनुभव येतो. मलीन मनाचे विचारही ह्या संताला कळतात म्हणूनच हा संत माझ्या दृष्टीने श्रेष्ठ ठरतो.

160

चौमुख निर्मिती

SURLOK सुरलोक सादर करते हैं

श्री साई भक्तों के लिये अपूर्व, अमोलिक व श्रवणीय
साई भक्ति से ओतप्रोत नवीन प्री रेकॉर्डेड

# हिन्दी कॅसेट श्री साईमहिमा

(श्री साईबाबा संस्थान, शिर्डीद्वारा पुरस्कृत)

| गीत | संगीत | निवेदक |
|---|---|---|
| राधाकृष्ण गुप्ता चेतन | बाळ चावरे | जगदीश जोशी व आशा गायकर |

**गायक कलाकार :**
अजित कडकडे, उत्तरा केळकर, श्यामा चित्तार, भूमानंद बोगम

| Side-I | Side-II |
|---|---|
| १ साई ! नमन तुम्हें शतवार | १ तेरे दरबार आई हूँ मैं |
| २ प्रभाते गूंज उठी शहनाई | २ पगले, साई तारनहार |
| ३ साई ! साई ! बोलो | ३ साई ! तुम हो दयानिधान |
| ४ आए शिरडी साई | ४ साईनाम की जप लो माला |
| ५ भज ले रे मन साईराम | ५ नाथ हरे साईनाथ हरे |

(सब म्युझिक शॉपों में उपलब्ध)
सोल डिस्ट्रीब्युटर

**ऑडियो सेल्स कॉर्पोरेशन**

४ बिन्दु, ७७ टिळक रोड, सान्ताक्रुज (प.)

फोन ५६६४८१

# साईधर्म

—श्री. ग. दे. कुलकर्णी
'कुलदीप' तांबरी, उस्मानाबाद

● जगातील सर्व धर्म व सर्व धर्मातील सर्वच संतानी आपापल्या परीने सर्व धर्म एकच आहेत, ईश्वर एकच आहे असे सांगितले आहे, तरी पण वेळोवेळी कलह होतच असतात.

आजच्या भारतात काही सर्व धर्मीय लोक ज्या एकाच संत भगवंताला पूजतात त्यात श्रीसाईबाबांचा परिवार सर्वात मोठा आहे. परंतु त्या परिवारातही जातीयता, परधर्मीयता ही भावना आहेच. ज्यांच्या मनात ही भावना आहे त्यांनी आपण श्रीसाईबाबांच्या परिवारात आहोत असे कृपया मनातही आणू नये. कारण श्रीसाईबाबांच्या जीवनाचा सारांश काढल्यास त्यांची जात 'मानव' आणि धर्म 'मानवता' होता.

सजातीय, सधर्मीय विवाहाला कायद्याने बंदी घालावी आणि बंदी मोडणाऱ्यास मृत्युदंड द्यावा हा एकच जातीयता आणि परधर्मीयता ही भावना मोडण्याचा एकमेव मार्ग आहे. पण भारतात ते सहज शक्य नाही म्हणून श्रीसाईबाबांसारख्या अन्य संत भगवंताच्या जे आपली जात 'मानव' आणि धर्म 'मानवता' मानतात अशा परिवारातील लोकांनी आपल्या आराध्य दैवताच्या शिकवणीनुसार आचरण ठेवल्यास भारतातून जातीयता. आणि परधर्मीयता या भावनेचे एका पिढीत उच्चाटन होईल.

मुसलमान धर्म स्वीकारलेल्या मुसलमान लोकात ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या ख्रिस्ती बुद्ध धर्म स्वीकारलेल्या बुद्ध लोकात किंवा आर्य समाजातील समाजात लग्न जमविण्याच्या वेळी मुलगी देताना तो आपल्याच पूर्वीच्या जातीत किंवा उच्च वर्णीयाच्या घरी देण्याचा वधुपक्षाचा प्रयत्न करतो, धर्मांतराचे ढोंग सिद्ध करतो. अशा ढोंगापायीच जातीयता आणि परधर्मीयतेची भावना फोफावते.

श्रीसाईबाबांच्या परिवारात समाजातील सर्व धर्म, सर्व थरातील सर्व प्रकारचे लोक आहेत. त्या सर्वांनी 'मानवता' हा 'साईधर्म,' मानव ही जात आणि श्रीसाईबाबा हेच धर्मसंस्थापक संतभगवंत आहेत हे शिकावे, शिकवावे व आचरावे. असे केल्यास पुढच्या पिढीतून जातीयता व परधर्मीयता याविषयी भावनेचे उच्चाटन झालेले दिसेल. ☆

## ग्रंथ परिक्षण

# श्रीसाईबाबा

[ मूळ लेखक – श्रीस्वामी शरणानंद, अनुवादक – श्री. विश्वासराव बाळासाहेब खेर, प्रकाशक – दिनपुष्प प्रकाशन, कृष्णा, १२ बी, डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४ पृष्ठे ४७२, किंमत ६० रुपये ]

भगवान श्रीसाईबाबांवर आज अनेक पुस्तके, ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत व होत आहेत. बाबांचे भक्त आजतर जगभर झालेले आहेत व आपल्या भक्तांना बाबा भेटतात, त्यांच्या अडीअडचणीला संकटांना धावून येतात याबद्दलचे असंख्य पुरावे देता येतील. निर्जीव व सजीव अशा प्रत्येक वस्तूवर दिव्य शक्तीमान पुरुष सत्ता चालवू शकतो अशी मान्यता या देशात प्रथम पासूनच होती. परंतु ती कालाच्या प्रवाहात लुप्त झाली होती ती आता भारतातील जनतेत पुन्हा प्रकट झाली आहे. या मान्यतेचा ज्वलंत, जिवंत पुरावा दृष्टांत म्हणजे पूर्ण परब्रह्म अवस्थेस पोचलेली श्री साईबाबा या नावाने ओळखली जाणारी दिव्य विभूती होय. अशा या श्रेष्ठ विभूती बद्दल अमदाबादचे वयोवृद्ध सुविद्य श्रीसाईभक्त श्री. वामनरावजी प्राणगोविंद पटेल उर्फ श्रीसाईशरणानंद यांनी गुजरातीतून एक छानदार पुस्तक १९४६ साली लिहिले व सुधारुन वाढविलेली सहावी आवृत्ती १९६६ साली प्रकाशित झाली श्री शरणानंदजीनी बाबांना चर्मचक्षूनी पाहिलेले आहे व त्यांचे आज वय ९२ वर्षांचे आहे. स्वामीजींनी मूळ गुजरातीतून लिहिलेल्या बाबांच्या वरील ग्रंथाचा सुरस मराठी अनुवाद तत्कालीन मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांचे चिरंजीव श्री. विश्वासराव यांनी या ग्रंथात केला आहे.

पूर्ण परब्रह्म अवस्थेस पोचलेली श्रीसाईबाबा ही विभूती वैज्ञानिकांचे संशोधनात प्रतिपादन केलेल्या सिद्धांताच्या एक पायरी पुढे जाऊ शकते हे सिद्ध करण्याचा यत्न या पुस्तकात केलेला आहे. या दशेस पोचलेली दिव्य विभूती कधीच नष्ट तर होत नाही उलट दृढ श्रद्धावान तसेच अनन्य शरण आलेल्या आर्त, जिज्ञासू, अर्थीर्थी व ज्ञानी यांच्यासाठी अजुनही प्रकट होऊन जरूर ते सहाय्य देते हे आवर्जून या ग्रंथात सांगितलेले आहे व ते सत्य आहे असा आमचाही निर्वाळा आहे.

या पुस्तकात बाबांची जन्म, जात, कूळ, शिरडीत त्यांचे अवतरण, सद्गुरुभक्ती अवतारकार्य, त्यांची उदी व त्या उदीचे चमत्कार, साईवाणी इत्यादी अशी १७

प्रकरणे असून ती वाचता वाचता श्रद्धावान भाविकाचे अंतःकरण बाबांच्या बद्दलच्या भावनेने अक्षरशः भरून येते व त्याच्या डोळ्यातून घळघळा अश्रुधारा वाहू लागतात.

ग्रंथामध्ये दहा प्रसंगोचित अशी छायाचित्रे पण आर्टपेपरवर छापलेली असून ती ग्रंथाच्या मौलिकतेत आणखीन भर टाकतात. ग्रंथाला नवशक्तीचे संपादक श्री. पु. रा. बेहेरे यांनी प्रस्तावना दाखल चार शब्द लिहिले असून ग्रंथात श्री शरणानंदजींचा सचित्र परिचय पण दिलेला आहे. ठिकठिकाणी लिहिलेल्या मजकूरात साईबाबा संस्थानचे मुखपत्र असलेल्या श्रीसाईलीला मासिकातील लेखांचा पण आधार म्हणून भक्कम पुरावा पण दिलेला आहे. प्रत्येक साईभक्ताने हा अमोल ग्रंथ आपल्या संग्रही ठेवावा अशी आमची शिफारस आहे.

●

# गायत्री मंत्र पुनश्च

श्रीसाईलीला मासिकाच्या मार्च ८२ अंकात आम्ही वाचकांच्यासाठी पान क्रमांक २ वर गायत्री मंत्र दिला होता परंतु त्या मंत्रात काही मुद्रण दोष आहेत असे आढळल्याने तो पुन्हा येथे देत आहोत. झालेल्या या अपराधाबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करतो–का. सं.

**गायत्रीमंत्र**

॥ ॐ भूः र्भुवः स्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो-देवस्य
धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥ ॐ

| | | | |
|---|---|---|---|
| या मंत्राचा जप | १) हवना प्रित्यर्थ | २,४०,००० | वेळा, |
| | २) तर्पणा प्रित्यर्थ | २४,००० | वेळा, |
| | ३) मार्जना प्रित्यर्थ | २४०० | वेळा, |
| | ४) प्रसादा प्रित्यर्थ | २४० | वेळा, |
| | एकूण जप संख्या | २,६६,६४० | वेळा, |

करावा असा आधार श्री. गो. प्र. भावे यांच्या मंत्रशास्त्र व श्री. रा. वि. पिंगळे यांच्या गायत्री मंत्र या पुस्तकात आहे.

162

# रामकृष्ण परमहंस आणि साईबाबा

—ले. कर्नल **मु. ब. निंबाळकर** (निवृत्त)
१/१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स
बंड गार्डन रोड, पुणे ४११ ००१

संतांची तुलना करु नये म्हणतात कारण—

**" कोठेही जा साधूंचे वर्णन । अथवा त्यांची राहणी चलन ।**
**एकाचे एक एकाचे आन । नसते समसमान कोठेंही ॥ ९७ ॥**
**एका संताचे आचरण । तें न दुजिया संता प्रमाण ।**
**योग्या योग्यतेचें अनुमान । कराया साधन हें नव्हे ॥ ९८ ॥**
**( श्रीसाईसच्चरित अ. ४९ )**

परंतु श्री रामकृष्ण परमहंसांची बाबांशी तुलना या लेखात मी मुद्दाम करण्याचे घाडस करीत आहे. श्री रामकृष्ण ( सन १८३६–१८८६ ) बाबांचे ( सन १८३८–१९१८ ) समकालीन संत होते. परंतु आपल्याकडील वाङ्मयात जसा अक्कलकोट स्वामी, गजानन महाराज, हजरत ताजुद्दीन बाबा वगैरेंचा बाबांचे समकालीन संत म्हणून उल्लेख केला जातो व त्यांची माहितीही दिली जाते तसा श्री रामकृष्णांचा होत नाही. कदाचित् त्यांचे वास्तव्य महाराष्ट्रापासून खूप दूर म्हणजे बंगालमध्येच होते म्हणून तसा उल्लेख राहून जात असेल. असो.—

श्री रामकृष्ण नुसत्या बंगालमध्येच नव्हे तर नंतर त्यांचे शिष्य स्वामी विवेकानंदांमुळे सर्व जगात प्रसिद्धीस पावले आणि आज त्यांना देहत्याग करून १०० वर्षे होत आली तरी ' श्रीरामकृष्ण मिशन ' अध्यात्मिक उपदेशाचे व लोक कल्याणाचे उत्तम कार्य करीत आहे. शिवाय कुठल्याही दोन संतांचे वर्तन, राहणी, चलन बाहेरून वेगळे दिसले, उपदेश करण्याचे मार्ग व पद्धती वेगळ्या असल्या तरी त्यांनी सांगितलेली तत्त्वे सारखीच असतात. तेव्हा त्यांची थोडीसी पाहणी केल्यास वावगे होणार नाही असे मला वाटते. आणखी मुख्य महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्री रामकृष्णांना श्री साईबाबांप्रमाणेच त्यांच्या हयातीत व आजही खास करून बंगालमध्ये ईश्वराचा अवतार मानतात.

तसे पाहिले तर श्री रामकृष्ण व श्री साईबाबा यांचे चरित्र दिसायला अगदी विरोधी आहे. श्री साईबाबांची जात, कुळ, जन्म व आईबाप यावद्दल काहीच माहिती नाही. ते हिंदु होते की मुसलमान हेही भक्तांना समजले नव्हते. परंतु श्री रामकृष्णांबद्दल सर्वच माहिती मिळते. त्यांचा जन्म बंगालमध्ये हुगली जिल्ह्याइ कमारपुकुर गावात चॅटर्जी आडनावाच्या उच्च ब्राह्मण घराण्यात १८ फेब्रुवारी १८३६ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव गदाधर होते व त्यांच्या वडिलाचे नाव खुदीराम आणि आईचे नाव चंद्रादेवी होते.

श्री साईबाबा आजन्म नैष्ठिक ब्रह्मचारी होते तर श्री रामकृष्णांचे लग्न झालेले होते. त्यांच्या पत्नीके नाव शारदामणी देवी होते, व त्या श्री रामकृष्णानंतर बरीच वर्षे [ सन १९२० पर्यंत] जिवंत होत्या. मात्र श्री रामकृष्णांचे व त्यांचे पतिपत्नी म्हणून शारिरीक संबंध कधीच नव्हते. दक्षिणेश्वरच्या मंदिरात व कलकत्त्यास श्री रामकृष्णांच्या राहण्याच्या ठिकाणी त्यांचा मुक्काम होता तरी त्या वेगळया खोलीत झोपत व पतीची स्वयंपाक वगैरे करून दुरूनच सेवा करीत. त्या श्री माँ [ Holy Mother ] या नावाने प्रसिद्ध आहेत.

श्री साईबाबांनी पूर्वी केलेल्या साधनेबद्दल किंवा त्यांचे गुरुबद्दल आपणांस स्पष्ट कल्पना नाही. श्री रामकृष्णांनी केलेल्या विविध साधनांबद्दल व त्यांनी वेगवेगळया गुरूंकडून घेतलेल्या दीक्षेबद्दल सर्व माहिती त्यांच्या चरित्रात सापडते. अद्वैत तत्वज्ञान व निर्विकल्प समाधि याचे शिक्षण त्यांनी प्रसिद्ध योगी तोतापुरी यांचेकडून घेतले व संन्यासाची दीक्षादेखील त्यांचेकडूनच घेतली. शाक्त पंथातील तंत्राचे शिक्षण भैरवी ब्राह्मणी या संन्यासिनीकडून घेतले. परंतु हे सर्व गुरू नावालाच होते. श्री रामकृष्ण कुठलीही गोष्ट [ समाधी देखील ] इतक्या लवकर आत्मसात करीत की त्यांचे गुरू आश्चर्यचकित होत. एवढेच काय कित्येक वेळा तर गुरूंनाच ह्या अद्वितीय शिष्याकडून काही शिकायला मिळे व ते त्याचेसमोर नतमस्तक होत असत. श्री रामकृष्णांनी सर्व प्रकारच्या साधना आत्मसात केल्या होत्या. वर निर्विकल्प समाधि व तंत्र यांचा उल्लेख केलाच आहे. त्या आधी दक्षिणेश्वराच्या मंदिरातील काली मातेला त्यांनी प्रसन्न करून घेतलेच होते. हठयोगही ते करीत असत. पुढे वैष्णव मार्गाने विविध प्रकारची भक्ती [ दास्य, सख्य, वात्सल्य, मधुर ] अवलंबून त्यांनी वेळोवेळी श्री कृष्ण दर्शन प्राप्त करून घेतले होते. एवढेच काय एकदा तीन दिवस ते मुसलमानी पंथाप्रमाणे 'अल्ला' चे नाव घेत, नमाज पढून व लुंगी नेसून राहिले आणि हिंदु देवाकडे गेलेही नाहीत, व पैगंबरांचे दर्शन घडल्यावर शांत झाले. तसेच एकदा तीन दिवस ख्रिश्चन

धर्माशी एकरूप झाले. बायबल वाचवून घेऊ लागले व मेरीच्या चित्राकडे पाहून ध्यानस्थ झाले. शेवटी त्यांना खुद्द जीझस भेटले—भेटलेच नाही तर त्यांनी श्री रामकृष्णांना आलिंगन दिले व त्यांचेशी एकरूप झाले.

श्री साईबाबा दिसायला उंचपुरे, रुंद खांदे असलेले व आजानुबाहु (गुढघ्यापर्यंत लांब हात असलेले) होते तर श्री रामकृष्ण हे दिसायला किरकोळ व बारीक होते. मात्र मधून मधून काही खास प्रसंगी दोघांचेही तोंडावर दिव्य तेज झळकायचे व त्यांचा रंग तांबुस सोनेरी दिसावयाचा. दोघांच्याही दर्शनात एक प्रकारची आकर्षण शक्ती होती.

श्री साईबाबांचा वेष एखाद्या मुसलमान फकीरासारखा तर श्री रामकृष्ण बंगाली बाबूप्रमाणे धोतर व उपरणे घेत. श्री साईबाबांचे वास्तव्य पडक्या मशिदीत किंवा चावडीत तर श्री रामकृष्णांचे बहुतेक आयुष्य दक्षिणेश्वर मंदिरातील खास खोलीत किंवा कलकत्त्यातील बंगल्यात. श्री साईबाबांचा शिष्य असा नव्हताच तर श्री रामकृष्णांनी स्वामी विवेकानंद या मुख्य शिष्यासह १६–१७ तरुणांना शिष्यत्व दिले व त्यांचेकरवी आपले पुढचे कार्य करवून घेतले.

अशाप्रकारे श्री रामकृष्ण व श्री साईबाबा यांच्या चरित्रात खूपच विरोध होता. तरीपण त्यांच्यात पुष्कळसे साम्यही होते. श्री साईबाबाप्रमाणेच श्री रामकृष्ण एकाच ठिकाणी म्हणजे हुगली (गंगा) नदीचे काठी दक्षिणेश्वर मंदिरात राहिले. क्वचित्‌च जवळच म्हणजे कलकत्त्याला गेले. ते कधीही आगगाडीने वगैरे दूरच्या प्रांतात गेले नाहीत. तसेच श्री रामकृष्ण हे प्रवचन किंवा भाषण करीत नसत. आलेल्या भक्तांना गोष्टीरूपानेच संभाषणात उपदेश देत असत. श्री साईबाबांप्रमाणेच त्यांचे शाळेत शिक्षण झालेले नव्हते तरी ते वेद व पुराणातील उतारे व उदाहरणे देऊन मोठमोठ्या शास्त्र्यांना देखील शरण यावयाला लावीत.

श्री साईबाबांप्रमाणेच श्री रामकृष्ण कांचन (धन) व कामिनी (स्त्री) यांच्या मोहापासून दूर राहिले. एकदा एका भक्ताने त्यांची परिक्षा पाहावयाला ते उठून बाहेर गेले असताना त्यांचे गादीखाली एक रुपया लपवून ठेवला. श्री रामकृष्ण परत आल्यावर गादीवर बसताक्षणीच उठले व म्हणाले, 'ही गादी अशुद्ध आहे. मला बसता येत नाही.' तेव्हा त्या भक्ताला लाज वाटली व आपली चूक कबूल करून तो रुपया त्याने काढून घेतला. आईच्या आग्रहावरून त्यांनी लग्न केले होते. परंतु पत्नीशी त्यांचे कसे संबंध होते हे वर सांगितलेच आहे. खरे म्हणजे श्री साईबाबांप्रमाणे ते ब्रह्मचारीच होते.

श्री रामकृष्ण त्यांना भेटावयास आलेल्या भक्तांच्या मनातले हेतु जाणत असत व त्यांना वैयक्तिकरीत्या त्यांच्या आवडीचे व कल्याणाचे मार्ग सांगत असत. आपले तरुण शिष्य की ज्यांचेकडून त्यांना पुढील कार्य करवून घ्यावयाचे होते त्यांनाच त्यांनी कडक वैराग्याचा व इंद्रिय निग्रह करून संन्यास घेण्याचा उपदेश केला. साधारण संसारी माणसाला तसा ते आग्रह करीत नसत. त्यांना ते कांचन व कामिनी यांच्या फार आहारी न जाता नारदांनी सांगितलेला नामस्मरणाचा सोपा भक्ती मार्गच सांगत असत. श्री साईबाबांच्या उपदेशाची पण अशीच तऱ्हा नव्हती काय? श्री उपासनी महाराजांसारख्या अधिकारी व्यक्तींना वेगळा उपदेश आणि नानासाहेब चांदोरकरांना वेगळा!!

श्री रामकृष्ण श्रीसाईबाबांप्रमाणे शिष्यांची परिक्षा देखील घेत असत. व शिष्याने गुरूशी कसे वागावे याचे शिक्षण देत असत. एकदा त्यांनी आपल्या एका शिष्याला (योगेन्द्रनाथाला) आपल्या खोलीतले झुरळ उचलून बाहेर नेऊन मारून टाकण्यास सांगितले. तो परत आल्यावर त्याला त्यांनी विचारले की झुरळ मारलेस का? त्याशिष्याने हिंसा करायची नाही. म्हणून ते नुसते फेकून दिले होते. त्याने तसे सांगितले, तेव्हा त्या शिष्यावर ते रागावले आणि उपदेश दिला की गुरूची आज्ञा कशीही असली तरी ती पाळलीच पाहिजे. या गोष्टीवरून श्रीसाईबाबांनी काकासाहेब दिक्षितांना बोकड मारावयास व दादा केळकरांना एकादशीचे दिवशी बाजारातून सागोती [मांस] आणण्याची आज्ञा कशी केली होती याची आठवण येते.

श्री रामकृष्ण श्रीसाईबाबांप्रमाणे कधी कधी [आपल्या] भक्तांचे रोग व पापेही अंगावर घेत असत व त्यांची दुःखे आनंदाने भोगीत असत. तसेच श्रीबाबांप्रमाणेच सर्व प्राणीमात्रांमध्ये ईश्वर पाहण्यास ते आपल्या भक्तांना सांगत असत. याच तत्वामुळे बाबांनी भागोजी शिंदेसारख्या महारोग्याकडून देखील सेवा करवून घेतली आणि बाळाजी नेवासकराला रक्तपित्तीने पीडिलेल्या दगडुभाऊ या मुसलमान गृहस्थाची सेवा करण्यास सांगितले. श्री रामकृष्णांच्या या तत्वाला त्याचे महान शिष्य विवेकानंद यांनी मूर्त स्वरूप दिले व अनाथ आणि पीडित लोकांची सेवा करणे हे श्री रामकृष्ण मिशनचे आद्य कार्य मानले.

श्री रामकृष्ण यांना शेवटी गळ्याचा कर्करोग झाला व त्या आजारातच त्यांनी १६ ऑगस्ट १८८६ रोजी देहत्याग केला. या आजारात इतके दुःख असून त्यांच्या मनाचा आनंद कमी झाला नाही किंवा शांती ढळली नाही किंवा आलेल्या भक्तां

उपदेश व दीक्षा देण्यात खंड पडला नाही. उलट या आजारामुळे त्यांची सेवा करण्याच्या निमित्ताने त्यांचे तरुण शिष्य एकत्र आले, त्यांच्यात प्रेम उत्पन्न झाले व पुढच्या श्री रामकृष्ण मिशनचा पाया घातला गेला.

श्री रामकृष्ण श्री साईबाबांचे आधी म्हणजे सन १८७५ ते १८८६ या काळात प्रसिद्धीस पावले व त्यांचेभोवती शेकडो भक्त गोळा झाले. त्याकाळी इंग्रजी शिक्षणाचा बंगालच्या तरुणांवर मोठा प्रभाव पडून बऱ्याचशा सुशिक्षित तरुणांना आपल्या हिंदु धर्मातील मूर्तिपूजा, तीर्थयात्रा वगैरेबद्दल नावड उत्पन्न झाली होती. एवढेच नव्हे तर काहींना ईश्वराच्या अस्तित्वाबद्दलही शंका वाटत होती. या तरुणांनी त्या विरुद्ध बंड पुकारण्यास ब्राम्हो समाज नावाची बंगालमध्ये संस्था स्थापन केली होती. अशावेळी कोणीतरी हिंदु धर्माची वेदांतातील खरी तत्त्वे स्वानुभावसह सांगून पटवून द्यावयाची होती व हिंदु धर्माचे रक्षण करावयाचे होते. ते कार्य श्री रामकृष्ण यांनी केले. त्यांनी अद्वैताची तत्वे तर समजावून सांगितलीच परंतु भक्तीमार्गाने ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन कसे प्राप्त करता येते हे स्वतः मिळवून पटवून दिले. त्यांच्या पट्टशिष्य स्वामी विवेकानंदानी तर त्यापुढे जाऊन वेदांमध्ये सांगितलेला धर्म हा फक्त हिंदुंसाठीच नाही तर सर्व जगाचा धर्म (Universal religion of humanity) आहे हे अमेरिका, इंग्लंडसारख्या सुधारलेल्या देशांना पटवून दिले.

श्री साईबाबांनी त्यांच्या काळात हिंदु व मुसलमानात जी दुही माजली होती ती सांधून त्यांचे ऐक्य साधले व सर्व धर्म एकच आहेत हे पटवून दिले. आजही त्यांना देहत्याग करून ६० वर्षे होऊन गेली तरी त्यांचे कार्य अदृश्यरूपाने चालू आहे.

‘या संतांच्या अनादि संस्था । गुह्य व्यवस्था कैशा त्या ॥ १३ ॥

यथाकाल–वर्तमान । जया जें जें आवडे स्थान ।
अवतार घेती कार्याकारण । परी ते अभिन्न परस्पर ॥ १४ ॥’

(श्री साईसच्चरित अ० २१)

# वाणी रामदासांची

संपादक प्रा. डॉ. श्री. गं. मोढे व श्री. तु. रा. मसुरकर प्रकाशक–श्री, तु. रा. मसुरकर अध्यक्ष लोकमान्य सेवा मंडळ २६३ चिंचपोकळी, मुंबई १२.

संत रामदास हे महाराष्ट्रातील जनसामान्यांचे आराध्य दैवत आहे. 'जय जय रघुवीर समर्थ' हा त्यांचा मंत्र घोष साऱ्या आनंदवन भुवनात घुमलेला आहे. जागोजागी रामभक्त मारुती रामाची मंदिरे उभारुन बलनिष्ठा, भक्तीभाव, महाराष्ट्र धर्म आणि सळसळते संचारत्व त्यांनीच निर्माण केले. त्यांचे स्मरण म्हणजे तुम्हा आम्हाला चैतन्यदायी व पुरुषार्थी ठरणार !

अशा श्री संत रामदास स्वामींच्या भक्तीसाहित्यातून बोधप्रद असणारी शुभाषिते आजच्या बालचमूला, नवीन पिढीला सुसंस्काराचे लेणे देणारी अशीच आहेत म्हणूनच रामदास स्वामींच्या त्रिशताब्दीच्या निमित्याने त्यांच्या सुभाषितांचे संकलन एक छोटेखानी पुस्तकरूपाने चिंचपोकळीच्या श्री. रा. तु. मसुरकरांच्या लोकमान्य सेवा मंडळाने यत्न केला आहे त्यांच्या या उपक्रमास आमच्या हार्दिक शुभेच्छा !

× × ×

# श्रीसाईगीत अर्चना

[ कवी व प्रकाशक श्री. रमाकांत पंडित, प्रभा स्मृती, भाऊ दाजी रोड, माटुंगा, मुंबई ४०००१९, किंमत २ रुपये ]

श्रीसाईलीलाचे एक लेखक व कवी श्री. रमाकांत पंडित यांनी लिहिलेला हा छोटासा श्रीसाई काव्यसंग्रह आहे. या संग्रहातील प्रत्येक सुमन स्वयंपूर्ण रहावे असा यत्न करून एकंदर २५ सुमनांचा हार त्यांनी आपल्या बुद्धीने गुंफून तो श्री साईबाबांच्या चरणी अर्पण केला आहे. हा गीत संग्रह सादर करताना त्यांनी आपल्या पत्नी दुर्गाबाईंचेही स्मरण केले आहे. या पुस्तकातून जे उत्पन्न येईल ते त्यांनी अपंग निधीसाठी किंवा एखाद्या अपंग कल्याण केन्द्राला देण्याचे ठरविले आहे. श्री बाबांच्या चरणी वाहिलेला हा काव्यसंग्रह भक्तांनी आदराने ग्रहण करावा अशी आमची आग्रहाची विनंती आहे.

× × ×

---

## आमची भोजन व्यवस्था नि भोजन गृह

● भक्तांसाठी सुरू केलेल्या माहितीपूर्ण व नाविन्यपूर्ण अशा लेखमालेतील लेखांक काही तांत्रिक अडचणीमुळे या अंकात देता आला नाही तो पुढील अंकी देऊ.

---

# मी प्रथम साईबाबांची केलेली आरती

जय साईनाथा । हरि ॐ साईनाथा ।
भक्तांचे दुःख हरिसी । कृपा दृष्टी करतां ॥ धृ. ॥ जय साईनाथा (२)

जे जैसे तुज भजती । मिळे तैसी त्यांना वृत्ती ।
सुख समृद्धी घरी येतो । मना लाभे शांतता ॥ १ ॥ जय साईनाथा (२)

माता पिता सम माया । भक्तांवरी करता ।
करीता आपुली सेवा । सन्मार्गी लावता ॥ २ ॥ जय साईनाथा (२)

एक परमेश्वरी रुप । महायोगी ज्ञानी ।
फकीर वेषे रहात । परि भगवंत दिसे ध्यानी ॥ ३ ॥ जय साईनाथा (२)

तुम्ही दयेचे सागर । भव सागर तारता ।
दास अज्ञानी सेवक । कृपा करी अनंता ॥ ४ ॥ जय साईनाथा (२)

दानी सिंधु सुखदातां । रक्षण करी सर्वांचे ।
साई अवतरले शिरडीत। कल्याणा जगता ॥ ५ ॥ जय साईनाथा (२)

सबुरी श्रद्धा वाढवी । विघ्न हरी देवा ।
संपावा चरणी जीवन । साईनाम घेता ॥ ६ ॥ जय साईनाथा (२)

—श्री. नंदकुमार राजाराम बेलवलकर
१९/३ राजाराम भुवन टिळकनगर
एम. जी. रोड गोरेगाव मुंबई ८२

# शुभकामना संदेश

असता निखिल दृश्य बाबा ।
अल्ला मालीक भला करो 'श्रीसाईलीला' ॥
हिरक महोत्सवी किर्तीच्या अंकाईला ।
अल्ला मालीक भला करो 'श्रीसाईलीला' ॥
जगा लावावे सत्पथी हेचि कृती-लीला ।
अल्ला मालीक भला करो 'श्रीसाईलीला' ॥
सदानंद देती संपादक अन् कार्यकारी-ला ।
अल्ला मालीक भला करो 'श्रीसाईलीला' ॥
पाठविता ह्या शुभकामना संदेशीला ।
अल्ला मालीक भला करो 'श्रीसाईलीला' ॥

—श्री. अशोक म्हात्रे
भीमवाडी, इराणी चाळ
ॲन्टॉप हिल रोड मुं. ३७

★

# दृढभावे साई भजता

साईचरणांबुज धरी रे मनुजा ।
तरी तो पावेल तुज श्रीहरी ॥ धृ ॥

दृढभावे तू साई भजता
संसारीच्या हरतील व्यथा
संसार सुखमय करी श्रीहरी ॥ १ ॥

जे जे भजती जैसा भावे ।
साई त्यांना तैसा पावे ।
उद्धार अपुला करी, रे मनुजा ॥ २ ॥

—श्री. रमाकांत नारायण पोंगुर्लेकर
१६/९ तालमकी वाडी ताडदेव रोड,
मुंबई ४०००७

# असेल का ती साईमाऊली

दारा पुढती सायंकाळी
होते काढीत मी रांगोळी -धृ-

भास कसा मला जाहला
अवचीत् कोणी हात धरला
देव घरामधे देवा पुढती
सांजवात मी दीप लाविला
तोच अचानक कानी आली
भर दे मेरी झोली...
दारा पुढती सायंकाळी -१-
दोन चिमुकली माझी बाले
आली दुडदुड धावत धावत
आणि म्हणाली मम्मी मम्मी
कोण आले बघ आपुलें घरांत
मी म्हणाले विचारून घ्या
नाव काय अन् कोण हवेत
डोयी फडका अंगी कफनी
काखे मध्ये दिसते झोळी...
दारा पुढती सायंकाळी -२-
राहवेना मज म्हणूनी आले
देव घरातूनी माजघरात
डोकावून मी पाहिले पण
मला दिसेना कोणी तिथं
अजिंक्य-असिताबाळे मज म्हणती
शिरडी मध्ये आपण पाहिली
असेल का ती साईमाऊली
दारा पुढती सायंकाळी -३-

—सौ. अस्मिता आल्हाद देशपांडे
१०४ बी. गंगापुरी, वाई

# मस्तक ठेवितो साईपायी

शिरडीस माझे लागतील पाय ।
तया चरणीं माझे मस्तक,
ठेवूनिया साई समाधीवरी ॥ १ ॥

मंदिरात मी जाता क्षणी ।
मन माझे प्रफुल्लीत होई,
पाहुनिया साईमूर्ती ॥ २ ॥

शिरडीत माझे पावूल लागे ।
घंटा निनादे कानी,
धावत जाई मन माझे साईपाशी ॥ ३ ॥

मस्तक ठेवितो समाधीवरी ।
कृपा ही बाबांची मजवरी,
मन माझे रमते साईठायी ॥ ४ ॥

हाक मारीता साई–साई ।
मन माझे हे धावत जाई,
मस्तक ठेवितो साईपायी ॥ ५ ॥

—श्री. वामन अ. वेंगुर्लेकर
मिलींद सहकारी गृह निर्माण संस्था
३/१७६, एम. एच. बी. कॉलनी
बोरीवली (प) मुंबई ९२

★

# जेथे साईनाम

पुण्यवंता घरी साईनाथ जातो ।
जेथे साईनाम मुखाने प्रभाती ॥ धृ ॥

ऐसा गुरुदेव शिरडीस बैसे
दत्त-अवधूत बैसोनिया हांसे
'बाबा' तो 'फकीर' उदीच्या सांगाती ॥ १ ॥

अतर्क्य ती लीला साईंचे जीवनी
'एक सब मालिक' साईनाथ वाणी
दीन-दुबळ्यांचा फकीर तो साथी ॥ २ ॥

चंद्र-सूर्य-तारे झळाळे आकाशी
दीपमाळ शोभे साईच्या प्रकाशी
कृपा लोटे सारी बाबांच्या त्या हाती ॥ ३ ॥

—श्री. अजित महादेव पावसकर
जे. १८/२ स. गो. बर्वेनगर,
घाटकोपर-मुंबई ४०० ०८४

卐

# साई गोड तुझे नाम

**राग भीमपलास**

(चाल : बीना मधुर मधुर कछु बोल)

साई गोड तुझे नाम । वदतां मजला हर्षचि होई
हृदयी आराम । साई गोड ।
भक्तांसाठी धावत येसी सोडुनी निजधाम । साई गोड ।
तुझिया चरणी मस्तक ठेवुनि करितो हे नमन । साई गोड ।
कृपाहस्त शिरि ठेवुनिया रक्षण करि साई । साई गोड ॥

—प्रा. भा. पुं. आडारकर
सी लॉर्ड, बी ३/४ कफपरेड,

# साईनाथा

शिरडीच्या साईबाबा घेई माझा दंडवत
मानवाच्या श्रेष्ठनाथा तू अनादी तू अनंत...॥ धृ ॥

पांगळा मी आंधळा मी मी अभागी अज्ञभोगी
भाव नाही ठाव नाही मी अघोरी आत्मरोगी
मार्ग दावी तू विरागी दशदिशांचा ज्ञानवंत...॥ १ ॥

चावडीचा स्पर्श झाला या रित्या माझ्या जिण्याला
द्वारकामाई करी रे रोषणाई तनमनाला
लेंडीबागेचा विसावा निंब हा आधारवंत...॥ २ ॥

तू धुनीला सार्थ केले अन् उदीचे तीर्थ झाले
तत्स्वरुपी तेज स्थिरले अमृताने पुण्य न्हाले
श्वास माझा दास तुझा तूच शंभो तूच दत्त...॥ ३ ॥

—श्री. दत्ता कदम एम. ए.
५७८ चव्हाण अपार्ट मेंटस
जंगली महाराज रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४

# साईलीला एकसष्टी

साहित्य रुपी साकारी ।
ईश्वरा तुझी कृती सारी ॥

लीला तू नित्य नूतन करुनी ।
लावितो ध्यास आम्हा मन्मनी ॥

स्वतः तू असून पुराण पुरुषा ।
रुप जरी घेसी फकिर वेषा ॥

पीयुष कटाक्ष फेकी आम्हावरी ।
श्रीराम रहिम तू गिरीधारी ॥

बालक तुझे मिळूनी रचित ।
बांधुनी गाथा एकसष्टीत ॥

चेतना तव प्रेम भक्तीची ।
चरणी अर्पण तत्परतेची ॥

—श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी
१२१/डी वार्ड
दत्त महाराज गल्ली कोल्हापूर

श्री साईनाथा प्रसन्न

# बाबा तुम्हीच साईराम

सुख भोगिले दुःख साहिले नाही विसरलो नाम
हृदयीचे घनःश्याम बाबा तुम्हीच साईराम ॥ धृ ॥

आज पंखातील पर हे झडले
स्वप्न नभीचे मृण्मयी विरले
कुठे आसरा? कुठे निवारा?
शोधु कुठे मी धाम?
हृदयीचे घनःश्याम बाबा तुम्हीच साईराम १

श्वास देहातील करी पुकार
तव नामाचा नित्य लाचार
नत होऊनी मस्तक माझे
चरणी घेई विराम
हृदयीचे घनःश्याम बाबा तुम्हीच साईराम २

माया ममता नसे उमाळा
तव कृपेचा राहो जिव्हाळा
तव नामाचा सदैव हृदयी
राहो पेटता होम
हृदयीचे घनःश्याम बाबा तुम्हीच साईराम ३

—श्री. प्रकाश विठ्ठल परब
वरळी, बी. डी. डी. चाळ नं. २१
रुम नं. १६ मुंबई ४०००१८

# प्रभो साईनाथा प्रभो साईनाथा

प्रभो साईनाथा । प्रभो साईनाथा
दीन दुबळ्यांना तूच रे उद्धारी ।
दीन अनाथांचा । तूच रे कैवारी ।
तुझ्याविण त्राता, कोण ह्या संसारी ।
प्रभो साईनाथा । प्रभो साईनाथा ॥ १ ॥

दर्शनास तुझ्या आसुसले फार
नको अंत पाहू, तूच रे आधार ।
घडो नित्य सेवा, जडो नित्य प्रीति ।
प्रभो साईनाथा । प्रभो साईनाथा ॥ २ ॥

तुझ्या दर्शनाला, धावूनी लोक येती
दर्शनास झाली, भक्तांची रे दाटी ।
उदी प्रसाद घेऊनी तृप्त होई मन ।
प्रभो साईनाथा । प्रभो साईनाथा ॥ ३ ॥

—सौ. शा. शां. दळवी
यशोधन ब्लॉक नं. ४ ठाकूर नगर,
संत रामदास रोड मुलुंड पूर्व मुं. नं. ८१

# शिरडी वृत्त माहे मार्च १९८२

या महिन्यात शिरडीस श्री साईबाबांचे दर्शनाकरिता साईभक्त मंडळी नेहमी-प्रमाणे आली होती. काही कलाकारानी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे:—

**कीर्तन** :– १) एकादशी व महत्वाचे दिवशी संस्थानतर्फे कीर्तने झाली.

**प्रवचन** :– १) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाघचौरे, शिर्डी.
२) श्री. कुमार सिद्धार्थ, इंदौर.

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे** :– १) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई २) श्री. अनंत पांचाळ, मुं. ३) श्री. मनोहर घडसे, मुं. ४) श्री. धोंडीराम शंकर आढाव, कोपरगांव. ५) श्री. अजीज बहुरुपी आणि पार्टी, हेरले. ६) श्री. शौकत बहुरुपी. ७) श्री. मकबूल बहुरुपी, हेरले. ८) श्री. बापू बहुरुपी, हेरले. ९) श्री. इलाई बहुरुपी, हेरले. १०) श्री. सुरेश श्रीवास्तव, कानपूर. ११) श्री. दत्त प्रासादिक भजनी मंडळ, चेंबूर. १२) श्री. श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुं. १३) श्री. रत्नाकर व्यास, मुं. १४) श्री. रतनलाल शर्मा, नागपूर. १५) डॉ. श्री. किर्तीकर, मुं.

**रंगपंचमी** :– सालाबादप्रमाणे रंगपंचमीचे दिवशी १४–३–८२ रोजी श्रींच्या रथाची मिरवणूक सायंकाळी ५ वाजता फिरून आल्यावर धूपारती झाली.

**गुढीपाडवा** :– सालाबादप्रमाणे गुढीपाडव्या निमित्त दि. २६–३–८२ रोजी सायंकाळी ५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर धूपारती झाली.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.